


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०८६ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# मुंबईचा महापौर कोण?

## बैठकीनंतर मोठा निर्णय : शिवसेना आणि भाजप मधील वरिष्ठ नेत्यांची महत्त्वाची बैठक; महापौर निवडीवर थेट परिणाम

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मुंबई महानगरपालिकेतील सत्तास्थापनेचा महत्त्वाचा टप्पा असलेल्या महापौर निवडीबाबत अखेर मोठा निर्णय झाला असून, भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये झालेल्या बैठकीनंतर महापौर निवडणूक तात्पुरती पुढे ढकलण्यावर एकमत झाल्याची माहिती समोर आली आहे. दोन्ही पक्षांमध्ये अद्याप महापौरपद आणि स्थायी समितीच्या अध्यक्षपदाबाबत अंतिम सहमती न झाल्याने, तसेच नगरसेवकांची गटनोंदणी प्रक्रिया अपूर्ण असल्याने 31 जानेवारी रोजी नियोजित असलेली महापौर निवडणूक होणार नसल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यामुळे आता मुंबईला नवीन महापौर फेब्रुवारी महिन्यात मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपने 89 जागा जिंकून मोठी मजल मारली असून, सत्ता स्थापनेच्या स्वप्नाच्या अगदी जवळ पोहोचली आहे. दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे 29



नगरसेवक निवडून आले आहेत. भाजप आणि शिंदे गट मिळून एकूण 118 नगरसेवकांचे बहुमताचे संख्याबळ तयार होते. तरीही, महापौरपदावर कोणाचा दावा असावा, यावर दोन्ही पक्षांमध्ये एकमत न झाल्याने सत्तास्थापनेचा वेग मंदावल्याचे चित्र आहे. युती असली तरी अधिकारवाटपावरून सुरू असलेली रस्सीखेच आता उघडपणे समोर आली आहे.

महापौरपदासाठी आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर मुंबईचे महापौरपद खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी आरक्षित झाल्याचं स्पष्ट झालं होतं. त्यानंतर महानगरपालिका प्रशासनाने 31 जानेवारी रोजी दुपारी 12 वाजता महापौर निवडणूक घेण्याचा निर्णय जाहीर केला होता. पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी याबाबत अधिकृत सूचना देखील दिल्या होत्या. नियोजनानुसार 27 जानेवारी रोजी उमेदवारी अर्ज दाखल होणार होते आणि 31 जानेवारीला निवडणुकीची जाहिरात देण्याची तयारीही प्रशासनाकडून सुरू होती. मात्र, अचानक रात्री उशिरा हा संपूर्ण कार्यक्रम पुढे ढकलण्याचा निर्णय झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

प्रशासनाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, महापौर निवडणूक पुढे ढकलण्यामागचं प्रमुख कारण म्हणजे भाजप आणि शिवसेना या दोन्ही पक्षांच्या नगरसेवकांची गटनोंदणी अद्याप पूर्ण झालेली नाही. महानगरपालिकेच्या नियमांनुसार गटनोंदणी पूर्ण झाल्याशिवाय महापौर निवडणूक घेता येत नाही. याशिवाय, भाजप आणि शिंदे सेनेचा एकत्रित गट स्थापन होणार की स्वतंत्र गट नोंदवले जाणार, यावरही अद्याप निर्णय झालेला नाही. या सगळ्या तांत्रिक आणि राजकीय अडचणींमुळे महापौर निवडीचा कार्यक्रम पुढे ढकलावा लागल्याचं प्रशासनाने स्पष्ट केलं आहे.

### फेब्रुवारी महिन्यात मुंबईला नवा महापौर मिळण्याची शक्यता

आता सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच महापौर निवडणुकीची नवी तारीख जाहीर केली जाणार असून, फेब्रुवारी महिन्यात मुंबईला नवा महापौर मिळण्याची शक्यता आहे. तोपर्यंत मुंबई महानगरपालिकेतील सत्तास्थापनेचा सस्पेन्स कायम राहणार आहे. बहुमत असूनही निर्णय लांबत असल्याने भाजप-शिंदे सेनेतील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा चर्चेत आले असून, मुंबईच्या राजकारणात पुढील काही दिवस महत्त्वाचे ठरणार आहेत.




## PM मोदींच्या ट्विटमधून 'हिंदूहृदयसम्राट' गायब

### बाळासाहेबांच्या जयंतीवरून नवा वाद; पक्ष, चिन्ह आता बिरुदही लंपास- अंबादास दानवे

**छत्रपती संभाजीनगर (समर्थ गांवकरी)**

शिवसेना पक्षाचे संस्थापक स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांची आज जयंती संपूर्ण महाराष्ट्रात उत्साहात साजरी करण्यात आली आहे. अनेक राजकीय नेत्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून बाळासाहेबांना आदरांजली वाहिली आहे. बाळासाहेबांची ओळख शिवसेना असेल किंवा भाजप असेल हे 'हिंदूहृदयसम्राट' अशी करतात. परंतु, जयंतीच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या ट्विटमधून 'हिंदूहृदयसम्राट' हे बिरुद गायब आहे. यावरून शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी जोरदार टीका केली आहे. अंबादास दानवे यांनी ट्विट करत म्हटले, एखाद्या



पोस्टमध्ये 'हिंदूहृदयसम्राट हे बिरुद लिहिलेले नसेल, तर भाजप भक्तांना अतीव दुःख आणि त्रास होतो. आज पंतप्रधान महोदयांच्या पोस्टमधून माननीय साहेबांचे 'हिंदूहृदयसम्राट' हे बिरुद वगळण्यात आले. आता भक्त कोणाला दूषण देणार, कुठे रडारड करणार? कारण त्यांच्या शीर्षस्थ नेतृत्वानेच हा शब्द वगळला आहे, असे दानवे यांनी म्हटले. पक्ष, चिन्ह, नेता आणि आता बिरुद.. गोष्टी लंपास करण्याची मालिका सुरूच दिसते, असा टोलाही अंबादास दानवे यांनी लगावला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करत म्हटले की, महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय परिदृश्यावर खोलवर परिणाम टाकणारे दिवंगत मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त, या दिग्गज व्यक्तिमत्त्वाला भावपूर्ण आदरांजली. तसेच तीक्ष्ण बुद्धिमत्ता, प्रभावी वक्तृत्व आणि ठाम विचारसरणीसाठी ओळखले जाणारे बाळासाहेब जनतेशी एक अद्वितीय नाते जपून होते. राजकारणाबरोबरच त्यांना संस्कृती, साहित्य आणि पत्रकारितेचीही विशेष आवड होती. व्यंगचित्रकार म्हणून त्यांच्या कारकिर्दीत समाजाचे सूक्ष्म निरीक्षण आणि विविध विषयांवरील निर्भय भाष्य दिसून येते.

## भिकाऱ्यांचे नेटवर्क : '...येथे भिकारी भाड्याने मिळतात'

**छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील सिग्नलवर दिसणारे ते केविलवाणे चेहरे, कडेवरचे रडणारे बाळ आणि मदतीसाठी पसरलेले हात... हे केवळ गरिबीचे दर्शन नसून त्यामागे एक भयानक व्यापार आणि संघटित नेटवर्क असल्याचे समोर आले आहे. शहरात चक्क अडीच हजार रुपयांच्या 'डेली रेंट' वर १ महिला आणि २ चिमुकली मुले भीक मागण्यासाठी भाड्याने मिळत असल्याचा धक्कादायक प्रकार स्टिंग ऑपरेशनमध्ये उघड झाला आहे. शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या क्रांती चौक, रेल्वे स्टेशन परिसर आणि उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या कॅनॉट प्लेसमध्ये हे रॅकेट फोफावले आहे. 'दिव्य मराठी' च्या प्रतिनिधीने बनावट ग्राहक (प्लॉटिंग व्यावसायिक) बनून या



टोळीशी संपर्क साधला. "आमच्या नवीन प्लॉटिंगच्या साइटवर येणाऱ्या ग्राहकांना दानशूरपणा दाखवण्यासाठी भीक देतात. त्यासाठी भिकारी हवे आहेत,' असे सांगताच या नेटवर्कच्या दलालांनी त्यांचे दरपत्रकच समोर ठेवले.

२४ तास पोलिसांचा पहारा असलेल्या क्रांती चौकासारख्या संवेदनशील ठिकाणी हे नेटवर्क बिनदिक्कतपणे चालत असल्याचे उघड झाले आहे.




## महाराष्ट्र सदन घोटाळा; भुजबळ मंत्री झाल्यावर ९३६ दिवसांनी निर्दोष

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

दिल्लीतील महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना मोठा कायदेशीर दिलासा मिळाला. लाचलुचपत प्रतिबंधक विभागानंतर सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) विशेष न्यायालयानेही त्यांची या प्रकरणातून निर्दोष मुक्तता केली आहे. त्यामुळे २०१६ सालापासून सुरू असलेल्या प्रकरणात तब्बल १० वर्षांनी भुजबळांनी यश मिळवले आहे. अजित पवारांसोबत राष्ट्रवादीतून बाहेर पडून ते २ जुलै २०२३ रोजी सत्तेत सहभागी झाले होते. त्यानंतर ९३६ दिवसांनी भुजबळांची या आरोपांमधून पूर्णत: मुक्तता झाली. शुक्रवारी विशेष पीएमएलए न्यायाधीश सत्यनारायण नावंदर यांनी भुजबळांसह इतर आरोपींचे निर्दोष मुक्ततेचे अर्ज मान्य केले. 'मूळ गुन्हा नसेल तर ईडीचा खटला चालू शकत नाही' या तांत्रिक मुद्द्यावर न्यायालयाने हा निकाल दिला. यात ईडीने भुजबळ, त्यांचे पुत्र पंकज आणि पुतणे समीरवर मनी लॉंड्रिंगचे आरोप केले होते. छगन भुजबळांवर असा आरोप होता की, महाराष्ट्र सदनाचा मूळ खर्च १३.५ कोटींचा होता. तो त्यांनी ५० कोटींवर नेला. विविध कंपन्यांकडून १३.५ कोटींची लाच घेतली. इतर कामांमधून सुमारे १९० कोटींचा नफा मिळवला. निकालानंतर भुजबळ म्हणाले की, तेलगी प्रकरण मला चिकटवण्यात आलं. त्या आरोपपत्रातही माझं नाव नसल्याचं स्पष्ट झालं. आताही या प्रकरणांमध्ये माझा दोष नसल्याचं



■ मूळ गुन्हा दाखल नसल्याच्या तांत्रिक मुद्द्यावर झाले मुक्त

समोर आलंय. हा सापशिडीचा खेळ आहे. भुजबळांच्या मुक्ततेचे दूरगामी राजकीय परिणाम होणार आहेत. कॅबिनेट मंत्री म्हणून काम करताना विरोधकांकडून होणारी कोंडी आता फुटेल. ओबीसींचे प्रभावी नेते म्हणून भुजबळांचे वजन वाढेल. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार, मूळ गुन्हा रद्द झाल्यास ईडीचा खटला टिकू शकत नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. यामुळे मनी लॉंड्रिंगच्या गुन्ह्यात अडकलेल्या इतर राजकीय नेत्यांना मोठा कायदेशीर आधार मिळाला आहे. भुजबळांच्या वकिलांनी सुनावणीत सर्वोच्च न्यायालयातील 'विजय मदनलाल चौधरी विरुद्ध केंद्र सरकार' खटल्यातील निर्णयाचा दाखला दिला. त्यानुसार एसीबीने दाखल केलेला मूळ गुन्हा रद्द झाला असेल, तर ईडीचा खटला स्वतंत्रपणे चालू शकत नाही. एसीबीने ९०० कोटींच्या अफरातफरीचा दावा केला होता. मात्र, हे सर्व निर्णय सामूहिक होते आणि लाच घेतल्याचे कोणतेही पुरावे नाहीत, हा भुजबळांचा दावा न्यायालयाने मान्य केला होता.






# सिद्धेश्वर वाडी ग्रामपंचायतीची ठाम भूमिका

## मंदिर व जमीन आमच्या अखत्यारीत; दिशाभूल करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईचा इशारा

### सिद्धेश्वर महादेव मंदिर पूर्णपणे सिद्धेश्वर वाडीचे; बदनामीचे प्रयत्न सहन करणार नाही



पारनेर : (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील सिद्धेश्वर वाडी गावातील सिद्धेश्वर महादेव मंदिर आणि त्यासंबंधित जमिनीच्या वादाने आता धर्मदाय आयुक्तांच्या न्यायालयात धडक दिली आहे. ग्रामपंचायतच्या म्हणण्यानुसार, हे देवस्थान आणि जमीन पूर्णपणे सिद्धेश्वर वाडी ग्रामपंचायतच्या अखत्यारीत आहे. मात्र, काही व्यक्ती वृत्तपत्रांद्वारे दिशाभूल करणारी माहिती पसरवत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या वादाच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतने आपली बाजू ठामपणे मांडली असून, उपलब्ध कागदपत्रांवरून त्यांचा दावा मजबूत असल्याचे दिसून येते. सिद्धेश्वर महादेव मंदिराची नोंद सिद्धेश्वर वाडी येथेच असून, १९८२ मध्ये तुकडेबंदी कायद्यानुसार गट क्रमांक ८५६ मध्ये ती नोंदवण्यात आली आहे. गट क्रमांक ३३०२ हा वनविभागाच्या मालकीचा असून, त्याचा ग्रामपंचायतशी काहीही संबंध नाही. ग्रामपंचायतच्या म्हणण्यानुसार, काही लोकांनी वृत्तपत्रांद्वारे दिलेली माहिती पूर्णपणे चुकीची आणि दिशाभूल करणारी आहे. या संदर्भात ३ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या ग्रामसभेत आवश्यक गणपूर्ती पूर्ण झाली असून, देवस्थानची नोंद धर्मदाय आयुक्तांकडे करण्यासाठी ठराव मंजूर करण्यात आला आहे.

ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदीनुसार ग्रामसभेचे अधिकार वापरून हा निर्णय घेण्यात आला असून, तो पूर्णपणे कायद्याच्या चौकटीत आहे. धर्मदाय आयुक्तांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वे आणि सूचनांचे काटेकोर पालन करून योग्य कागदपत्रांसह प्रकरण आयुक्तांकडे सादर करण्यात आले आहे. त्यामुळे आयुक्तांची दिशाभूल करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ग्रामपंचायतच्या नोंदी बेकायदेशीर ठरवण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींचा सिद्धेश्वर वाडीशी काहीही संबंध नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्या व्यक्तींचे आरोप निराधार असून, ते राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे दिसते.

ग्रामपंचायत कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या लेखी पुराव्यांनुसार, मंदिर आणि जमीन ग्रामपंचायतच्या दप्तरी नोंदवलेली आहे. २०१५ मध्ये धर्मदाय आयुक्तांनी सिद्धेश्वर वाडीच्या कायमस्वरूपी रहिवाशी ग्रामस्थांमधून ग्रामसभेद्वारे विश्वस्तांची निवड करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार विश्वस्तांची निवड करण्यात आली असून, हा अधिकार पूर्णपणे आयुक्तांचा आहे. आयुक्त योग्य निर्णय घेतील, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

---

# “शब्दात विश्वास, कृतीत विकास; म्हणूनच जनशक्ती आमच्यासोबत” : आ. काशिनाथ दाते

पारनेर : (समर्थ गांवकरी)

शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ रोजी पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते ढोकी येथील गावठाण परिसरातील रस्ता कॉंक्रीटीकरणासह विविध विकासकामांचे भूमिपूजन उत्साहात पार पडले. या विकासकामांमुळे ढोकी व परिसरातील नागरिकांना दळणवळणासह मूलभूत सुविधांचा मोठा लाभ होणार आहे.



यावेळी बोलताना आमदार दाते सर म्हणाले की, “आमच्या शब्दात विश्वास आणि कृतीत विकास आहे, म्हणूनच जनशक्ती आमच्यासोबत ठामपणे उभी आहे.” गेल्या वर्षभरात तालुक्यातील विविध गावांतील नागरिकांच्या मागणीनुसार अनेक विकासकामे मार्गी लागली असून, त्याचा वेग सर्वसामान्य नागरिक अनुभवत आहेत, असे त्यांनी नमूद केले. केवळ तात्कालिक कामांपुरते न थांबता, भविष्याचा वेध घेऊन मतदारसंघातील नागरिकांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मोठे व दूरगामी प्रकल्पही कार्यान्वित होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार तसेच संपूर्ण मंत्रीमंडळाचे भक्कम सहकार्य लाभत असल्याने मतदारसंघातील विकासकामांना गती मिळत असल्याचे आमदार दाते सरांनी यावेळी स्पष्ट केले. “नागरिकांनी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या प्रतिनिधींच्या पाठीशी उभे राहिल्यास विकासाचा वेग निश्चितच वाढतो,” असा विश्वास व्यक्त करत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून गट-तट बाजूला ठेवून कामाच्या माणसांना निवडून दिले पाहिजे असे आवाहन केले.

---

# पक्षीमित्र संमेलनाचा समारोप उत्साहात !

रावेर : (समर्थ गांवकरी)

पाल येथे चातक निसर्ग संवर्धन संस्था, वरणगाव यांच्या वतीने आयोजित पाचव्या उत्तर महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. दिनांक २७ ते २८ दोन दिवस चाललेल्या या संमेलनात पक्षी अभ्यास, निसर्ग संवर्धन व जैवविविधता विषयक विविध संशोधनात्मक सत्रे व चर्चासत्रे झाली. समारोप सोहळ्याला संमेलनाध्यक्ष डॉ. विनोद भागवत, प्रमुख अतिथी एम. झेड सरवर (IOFS), पुनित अग्रवाल, वन प्रशिक्षण केंद्राचे संचालक हेमंत शेवाळे, उत्तर महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे पदाधिकारी, चातक निसर्ग संवर्धन संस्थेचे अध्यक्ष अनिल महाजन, समन्वयक विलास महाजन तसेच वनपरीक्षेत्र अधिकारी शीतल नगराळे, यांच्यासह मान्यवर उपस्थित



होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शनपर भाषण केले. त्यांनी पक्षी संरक्षण, निसर्ग संवर्धन व जैवविविधता जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

अशा संमेलनांमुळे पर्यावरणाविषयी जनजागृती होत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. संमेलनाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजक संस्था चातक निसर्ग संवर्धन संस्था, वरणगाव, वनविभाग नाशिक, उत्तर महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना तसेच सहकार्य करणाऱ्या सर्व संस्था व स्वयंसेवकांचे आभार मानण्यात आले. सहभागी अभ्यासक व मान्यवरांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

या संमेलनात राज्यभरातून सुमारे १५० पक्षी अभ्यासक, संशोधक व निसर्गप्रेमी सहभागी झाले होते. निसर्ग संवर्धनाचा संदेश देत व पुढील वर्षी अधिक व्यापक स्वरूपात संमेलन आयोजित करण्याचा संकल्प करत संमेलनाचा समारोप झाला.

---

# दिव्यात रविवारी मोफत वंध्यत्व निवारण शिबीराचे आयोजन

ठाणे : (समर्थ गांवकरी)

निर्माण IVF मधील उच्चतम तंत्रज्ञान आणि तज्ज्ञ डॉक्टर्सच्या मदतीने, तुमच्या किंवा तुमच्या घरातील सदस्यांचा आई-बाबा होण्याच्या स्वप्न साकार होणार आहे तर थोडक्यात आई-बाबा होण्याचं स्वप्न पूर्ण करता येणार आहे. डोंबिवली येथील गेली २५ वर्षाचे अनुभवी प्रसिद्ध डॉ. सौ माधुरी मानकर ( MD, DGO) व श्री राजेश मानकर (MD) यांच्या सेवांचा लाभ घेऊन तुमच्या कुटुंबात नवीन सदस्याच्या आगमनाची तयारी करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. गर्भधारणेत अडचणी असलेल्या जोडप्यांसाठी दिव्यात मोफत वंध्यत्व निवारण शिबीराचे येत्या आयोजन करण्यात आले आहे.

---

# आयएसएसटीच्या “लाईफ लेसन्स थ्रू स्पोर्ट्स” उपक्रमात पुण्यात जॉन्टी रोड्स यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन

पुणे : (समर्थ गांवकरी)

इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स सायन्स अँड टेक्नॉलॉजी (ISST), पुणे यांच्या ‘ह्युमन्स इन स्पोर्ट्स’ या प्रमुख उपक्रमांतर्गत जागतिक क्रिकेट दिग्गज श्री. जॉन्टी रोड्स यांच्या उपस्थितीत एक प्रेरणादायी आणि विचारप्रवर्तक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम बावधन येथील आयलीझियम क्लब येथे पार पडला, ज्यांनी या कार्यक्रमासाठी व्हेन्यू पार्टनर म्हणून सहकार्य केले.

१६ जानेवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक, शिक्षक, क्रीडा उद्योगातील व्यावसायिक तसेच क्रीडा क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. ‘लाईफ लेसन्स थ्रू स्पोर्ट्स’ या विषयावर आधारित हा संवादात्मक सत्र मानसिकता,




चिकाटी, नेतृत्व आणि दीर्घकालीन विकास यांवर केंद्रित होता. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयएसएसटीच्या संचालक (ऑपरेशन्स) सौ. तन्वी लुणावत यांनी अत्यंत प्रभावीपणे केले.

जागतिक क्रिकेटमधील सर्वोत्तम क्षेत्ररक्षकांपैकी एक म्हणून ओळखले जाणारे श्री. जॉन्टी रोड्स यांनी आपल्या क्रिकेट प्रवासातील अनुभव सांगताना संघभावना, प्रक्रियेवर विश्वास आणि वैयक्तिक कामगिरीपेक्षा सामूहिक योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, खेळ जीवनातील मूल्ये घडवतो आणि ती मैदानाच्या पलीकडेही उपयोगी ठरतात.

या वेळी बोलताना श्री. जॉन्टी रोड्स म्हणाले: “संघाचा भाग असणे म्हणजे केवळ स्वतःची कामगिरी नव्हे, तर इतरांच्या प्रगतीसाठी योगदान देणे आणि त्यांना पुढील पातळीवर नेण्यासाठी मदत करणे होय. खेळ आपल्याला निकालापेक्षा प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करायला शिकवतो. आपण सर्व काही योग्य पद्धतीने केले तरी काही गोष्टी आपल्या नियंत्रणाबाहेर असतात. मात्र शिस्त, सातत्य आणि प्रक्रियेवर विश्वास ठेवल्यास दीर्घकालीन यश निश्चित मिळते.”

---

# नेक्सस व्हेंचर पार्टनर्स यांच्या नेतृत्वाखाली गुंतवणूक

■ भारतातील ‘असिस्टेड वेल्थ मॅनेजमेंट’चे भविष्य घडवण्यासाठी AssetPlus ला ₹175 कोटींचा भांडवली निधी

AssetPlus च्या मते, भारतातील संपत्ती निर्मितीचा पुढचा टप्पा ‘असिस्टेड मॉडेल्स’द्वारेच पुढे जाईल, जिथे तंत्रज्ञान वितरकांना जोखीम-संतुलित व उद्दिष्ट-केंद्रित गुंतवणूक सल्ला देण्यासाठी सक्षम करेल. उत्पादनांची विक्री न करता, जीवनाच्या विविध टप्प्यांनुसार आर्थिक निर्णय घेण्यास मदत करणारा हा प्लॅटफॉर्म सल्ला, अनुपालन, ऑपरेशन्स आणि विविध आर्थिक उपाय एकाच अखंड अनुभवात एकत्र आणतो.

पुणे : (समर्थ गांवकरी)

भारतातील आघाडीच्या पूर्णपणे डिजिटल-असिस्टेड वेल्थ मॅनेजमेंट प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या ॲसेटप्लस (AssetPlus) ने ₹१७५ कोटींच्या निधी उभारणीची घोषणा केली आहे. ही फंडिंग फेरी नेक्सस व्हेंचर पार्टनर्स यांच्या नेतृत्वाखाली झाली असून, यामध्ये एट रोड्स व्हेंचर्स, नितीन कामथ यांचा रेनमॅटर फंड आणि बुपिंदर सिंग यांचाही सहभाग आहे. भारतात वितरक-केंद्रित, शाश्वत वेल्थ मॅनेजमेंट पायाभूत रचना उभारण्याच्या AssetPlus च्या दीर्घकालीन उद्दिष्टातील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

केवळ व्यवहार किंवा साधनांपुरते संपत्ती निर्माण मर्यादित नसते, या मूलभूत विश्वासावर AssetPlus ची स्थापना झाली आहे. तंत्रज्ञान मानवी सल्ल्याची जागा न घेता त्याची ताकद वाढवेल, अशा समग्र ‘असिस्टेड वेल्थ मॅनेजमेंट’ परिसंस्थेची उभारणी कंपनी करत आहे. विश्वासार्ह आणि प्रमाणित वितरकांना सक्षम करून भारतीय कुटुंबांना अधिक परिणामकारक, सातत्यपूर्ण आणि व्यापक पातळीवर सेवा देता यावी, हा कंपनीचा मुख्य उद्देश आहे. AssetPlus चे सहसंस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी विश्रांत सुरेश म्हणाले, “आमचे उद्दिष्ट केवळ आणखी एक वितरण प्लॅटफॉर्म उभारण्याचे कधीच नव्हते. मानवी सल्ला आणि तंत्रज्ञानाद्वारे मिळणारी विस्तारक्षमता यांचा संगम साधणारी वेल्थ मॅनेजमेंट पायाभूत रचना आम्ही उभारत आहोत.

दीर्घकालीन दृष्टीकोनातून भारताच्या वेल्थ इकोसिस्टमला बळकटी देण्यावर विश्वास ठेवणाऱ्या गुंतवणूकदारांसोबत ही दृष्टी वेगाने प्रत्यक्षात आणण्यासाठी हा निधी महत्त्वाचा ठरेल.” उभारण्यात आलेला निधी कंपनीचा तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म अधिक सक्षम करण्यासाठी, उत्पादनांची व्याप्ती वाढवण्यासाठी आणि समग्र वेल्थ मॅनेजमेंटला पाठबळ देणाऱ्या उपक्रमांसाठी वापरण्यात येणार आहे. म्युच्युअल फंड हे केंद्रस्थानी असले तरी, आरोग्य विमा आणि टर्म प्लॅन्ससारख्या सुविधांद्वारे एकाच प्लॅटफॉर्मवर संपूर्ण आर्थिक उपाय देण्याची क्षमता AssetPlus वितरकांना उपलब्ध करून देते. भारतातील गुंतवणूक क्षेत्रात सध्या मोठा संरचनात्मक बदल होत आहे.

गुंतवणूकदारांचा सहभाग वाढत असून, जागरूकता वाढली आहे आणि लाखो नवोदित गुंतवणूकदार बाजारात प्रवेश करत आहेत. मात्र, ‘डू-इट-युअरसेल्फ’ (DIY) पद्धतीच्या मर्यादाही आता स्पष्ट होत आहेत. बाजारातील अस्थिरता, भावनिक निर्णय, विखुरलेली आर्थिक उत्पादने आणि दीर्घकालीन नियोजनाचा अभाव यामुळे केवळ प्रवेश पुरेसा नसल्याचे दिसून येत आहे.

---

# आई माझ्या महाविद्यालयात उपक्रम

पारनेर: (समर्थ गांवकरी)

मुलिका देवी महाविद्यालयाच्या वतीने आई माझ्या महाविद्यालयात हा सामाजिक उपक्रम शनिवार दि.२४ रोजी सकाळी ११ वाजता महाविद्यालयात संपन्न होत असून जी एस महानगर बँकेच्या चेअरमन गीतांजलीताई शेळके, जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या खजिनदार ॲड.दिपलक्ष्मी म्हसे, जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या विश्वस्त निर्मलताई काटे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सहदेव आहेर यांनी दिली आहे. गेली सात वर्षांपासून आई माझ्या महाविद्यालयात हा कार्यक्रम प्रत्येक वर्षी महाविद्यालयात होत असून विद्यार्थ्यांचे पालक म्हणून आई वडील आवर्जून या कार्यक्रमास उपस्थित राहात आहेत.

---

# ठाणे शहर वाहतूक पोलिस उपायुक्तालय तर्फे ३६ वा रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत

ठाणे: (समर्थ गांवकरी)

ठाणे शहर वाहतूक ३६ वा रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत, ठाणे शहर वाहतूक उपायुक्त पंकज शिरसाट साहेब यांच्या आदेशानुसार, कल्याण वाहतूक विभागाचे एसीपी किरण बलवडकर यांचे नेतृत्वाखाली,

कोळसेवाडी वरिष्ठ वाहतूक पोलीस निरीक्षक श्री.सचिन सांडभोर,

कल्याण पश्चिम चे वरिष्ठ वाहतूक पोलिस निरीक्षक श्री. मिलिंद झोडगे व इतर अधिकारी

अंबरनाथ वाहतूक पोलीस उपनिरीक्षक श्री गवळी, उल्हासनगर वाहतूक पोलीस निरीक्षक राजेंद्र शिरसाट, विठ्ठलवाडी वरिष्ठ वाहतूक पोलिस निरीक्षक पडवळ साहेब, यांचा उपस्थितीत अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी शालेय




विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे पालन करणे बाबत जनजागृती करण्यासाठी शाळांमध्ये वाहतूक विषयक जनजागृती करणे व विद्यार्थ्यांना वाहतुकीबाबत शिस्त असणे अनुषंगाने ठाणे वाहतूक विभाग यांच्या वतीने आर एस पी च्या विद्यार्थ्यांची विभाग वार्षिक स्पर्धा आयोजित केली होती दिनांक 22/01/26 वार गुरुवार रोजी सकाळी 7.00 वाजता. रस्ता सुरक्षा अभियान विभागीय नोडल अधिकारी श्री. मनिलाल शिंपी, श्री.दिलीप स्वामी , कल्याण जिल्हा समन्वय अधिकारी अनंत किनगे, विनोद शेलकर,यांचा मार्गदर्शनाखाली कल्याण , उल्हासनगर विभागातील शाळांमध्ये आर एस पी बालसैनिकांची परेड संचलन स्पर्धा निवड चाचणी यशवंतराव चव्हाण मैदान (मॅक्सी ग्राउंड) कल्याण पश्चिम. या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती.


---

# अध्यक्षपदी सुर्यभान आहेर , उपाध्यक्षपदी राजेंद्र आहेर

गणोरे : (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील गणोरे येथील आहेर पाटील ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्ष पदी सुर्यभान आहेर यांची तर उपाध्यक्ष पदी बाळासाहेब आहेर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. आहेर पाटील पतसंस्थेच्या संचालक मंडळाची मासिक सभा नुकतीच निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून हर्षला शिरसाठ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी चेअरमन व व्हाईस चेअरमन पदाची निवड प्रक्रिया बिनविरोध करण्यात आली. यावेळी अध्यक्षपदासाठी सूर्याभान पंढरीनाथ आहेर यांच्या नावाची सूचना रंगनाथ विष्णू आहेर यांनी मांडली त्यास एकनाथ विठोबा आहेर यांनी अनुमोदन दिले तर उपाध्यक्ष पदासाठी बाळासाहेब राजेंद्र आहेर यांच्या नावाची सूचना





राजाराम मारुती आहेर यांनी मांडली त्यास सोमनाथ रामनाथ आहेर.यांनी अनुमोदन दिले. दोन्ही पदासाठी एक एक अर्ज आल्याने दोन्ही पदाची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी एकनाथ आहेर,गंगाराम मेंगाळ,बाबासाहेब पवार,संगिता आहेर,स्वाती आंबरे,व्यवस्थापक एम.डी. आंबरे, कॅशिअर दिपक आहेर, लिपिक देविदास आहेर व संचालक उपस्थित होते. निवडणूक अधिकारी हर्षला शिरसाठ व सहाय्यक निवडणूक अधिकारी मोहन आंबरे यांनी काम पाहिले. यानंतर चेअरमन व्हा चेअरमन यांचा सत्कार करण्यात आला.

---

# ‘सेंटर ऑफ एक्सलन्स इन AWR अँड हर्निया सर्जरी’ मान्यता

### ओबेसिटी क्लिनिकचेही भव्य उद्घाटन

नाशिक : (समर्थ गांवकरी)

अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक यांना Abdominal Wall Reconstruction Surgeons' Community (AWRSC) तर्फे ‘Center of Excellence in AWR & Hernia Surgery (COEAWR)’ ही मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या मान्यतेमुळे अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलला Abdominal Wall Reconstruction (AWR) Surgery आणि Hernia Surgery या क्षेत्रातील उत्कृष्ट सेवेसाठी “सेंटर ऑफ एक्सलन्स” म्हणून अधिकृत ओळख मिळाली आहे. ही मान्यता १ जानेवारी २०२६ पासून पुढील दोन वर्षांच्या कालावधीसाठी लागू राहणार असून, उत्तर महाराष्ट्रातील आरोग्यसेवा क्षेत्रासाठी ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे.

ही मान्यता प्रामुख्याने अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे वरिष्ठ गॅस्ट्रोइंटेस्टाइनल सर्जन डॉ. संदीप सी. सबनीस यांच्या नेतृत्वाखाली AWR व हर्निया शस्त्रक्रियांच्या क्षेत्रात करण्यात आलेल्या सातत्यपूर्ण, उच्च दर्जाच्या आणि रुग्ण-केंद्रित कामगिरीबद्दल देण्यात आली आहे. त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये डॉ. प्रखर गुप्ता, डॉ. उर्विक पाटील आणि डॉ. हेमंत बागुल यांचा मोलाचा सहभाग असून, हॉस्पिटलचे भूलतज्ञ, ऑपरेशन थिएटर (OT) टीम आणि नर्सिंग स्टाफ यांच्या उत्कृष्ट टीमवर्कमुळे






ही कामगिरी शक्य झाली आहे.

यावेळी प्रतिक्रिया देताना डॉ. संदीप सबनीस म्हणाले, “COEAWR ही मान्यता केवळ अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल टीमसाठीच नव्हे, तर संपूर्ण उत्तर महाराष्ट्रातील आरोग्यव्यवस्थेसाठी गौरवाची बाब आहे. AWR आणि हर्निया सर्जरीमध्ये सुरक्षितता, अचूकता आणि रुग्णाचा जलद पुनर्वसन हा आमचा मुख्य उद्देश राहिला आहे. आधुनिक तंत्रज्ञान, शास्त्रीय उपचारपद्धती आणि उत्कृष्ट टीमवर्क यांच्या जोरावर आम्ही रुग्णांना जागतिक दर्जाच्या शस्त्रक्रिया नाशिकमध्येच उपलब्ध करून देत आहोत.”

अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे केंद्र प्रमुख श्री. अनुप त्रिपाठी यांनी समाधान व्यक्त करताना सांगितले, “ही मान्यता अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलच्या शस्त्रक्रिया विभागातील उत्कृष्टतेची पावती आहे. AWR व हर्निया सर्जरीसोबतच गॅस्ट्रोइंटेस्टाइनल शस्त्रक्रिया, लिव्हर ट्रान्सप्लांट, मिनिमली इन्वेसिव्ह सर्जरी तसेच इतर सुपर-स्पेशालिटी शस्त्रक्रियांच्या क्षेत्रात आमचे डॉक्टर सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. रुग्ण-केंद्रित दृष्टिकोन, अत्याधुनिक सुविधा आणि अनुभवी वैद्यकीय टीम यांच्या बळावर नाशिक व उत्तर महाराष्ट्रासाठी आम्ही उत्कृष्ट आरोग्यसेवा देत आहोत.” या मान्यतेच्या निमित्ताने, रुग्णांना सर्वांगीण आणि दीर्घकालीन आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये ‘ओबेसिटी क्लिनिक’ (स्थूलत्व उपचार केंद्र) चेही उद्घाटन करण्यात येत आहे. सध्याच्या बदलत्या जीवनशैलीमुळे स्थूलत्व (Obesity) ही एक गंभीर आरोग्य समस्या बनली असून, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, सांधेदुखी, झोपेत श्वासोच्छवासाचा त्रास (Sleep Apnea), फॅटी लिव्हर तसेच पचनसंस्थेचे विविध आजार यांसारख्या अनेक समस्यांचे मूळ ठरत आहे. या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात येणाऱ्या ओबेसिटी क्लिनिकच्या माध्यमातून रुग्णांना वजन कमी करण्यासाठी वैयक्तिकृत (Personalized) उपचार योजना, आहारतज्ज्ञांचे मार्गदर्शन, व्यायाम व जीवनशैली सुधारणा, हार्मोनल व मेटाबॉलिक तपासण्या, तसेच आवश्यकतेनुसार औषधोपचार आणि तज्ज्ञांचा सल्ला दिला जाणार आहे. या क्लिनिकचे मुख्य उद्दिष्ट केवळ वजन कमी करणे नसून, रुग्णांचे एकूण आरोग्य सुधारून दीर्घकालीन निरोगी जीवनशैली निर्माण करणे हे आहे.

# हिंद-दी-चादर श्री गुरू तेग बहादूरजी : मनाचे श्लोक

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

शीख धर्माचे नववे गुरू श्री गुरू तेग बहादूरजी यांना संपूर्ण भारतात "हिंद दी चादर" (भारताचे संरक्षक) म्हणून ओळखले जाते. त्यांचे स्थान केवळ शीख इतिहासातच नाही, तर प्रत्येक भारतीयाच्या हृदयात आदराचे आहे. ते केवळ एक धार्मिक नेते नव्हते, तर मानवी सन्मान, श्रद्धा स्वातंत्र्याचे सर्वोच्च रक्षक होते. त्यांचे जीवन आणि कृती आपल्याला स्वतःच्या धर्मापलीकडे जाऊन मानवतेची मूल्ये कशी जपावीत, याबाबत शिकवते.

श्री गुरू तेग बहादूरजी असे योद्धे होते, की वयाच्या १४ व्या वर्षी मोगलांबरोबरच्या युद्धात त्यांनी अतुलनीय शौर्य गाजवले. तलवारीने शत्रूस कंठस्नान घातले. म्हणून त्यांचे नाव तेग बहादूर ठेवले गेले. तरीही पुढे अध्यात्मिक साधनेमुळे ते पूर्णपणे स्थिरमती बनले. सुख, दु:ख, हर्ष, खेद यापासून मुक्त, असे मुक्तामा बनले. त्यांना ठार मारण्यासाठी आलेल्या मारेकऱ्यासही त्यांनी क्षमा केली, केवढे हे त्यांचे औदार्य आणि मनाची ताकद.

श्री गुरू तेग बहादूरजी यांचे पुत्र शीख धर्मियांचे दहावे आणि अंतिम देहधारी गुरू श्री गुरू गोबिंद सिंग जी. त्यांनी नांदेड येथे देह त्यागण्यापूर्वी त्यांच्यानंतर देहधारी गुरू असणार नाही, असे घोषित केले. पवित्र गुरू ग्रंथ साहिब यांना गुरूपद बहाल केले. या पवित्र गुरू ग्रंथ साहिबमध्ये श्री गुरू तेगबहादूर जी यांच्या ५९ पद्यांचा व ५७ श्लोकांचा अशा एकूण ११६ रचनांचा समावेश आहे.

पवित्र ग्रंथ श्री गुरू ग्रंथ साहिबचा प्रारंभ श्री गुरू नानकदेवांच्या जपुजी साहिब वाणीने झाला. तर हिंद-दी-चादर श्री गुरू तेग बहादूरजी यांच्या श्लोकांनी समारोप. पवित्र गुरू ग्रंथ साहिब १ हजार ४३० पानांचा आहे. पान क्रमांक १ हजार ४२५ ते १ हजार ४२८ यावर श्री गुरू तेगबहादूरजी यांचे मनाचे श्लोक अंकित आहेत. श्री गुरू तेगबहादूरजी (गुरूजी) यांच्या श्लोकांमध्ये साधकास परमेश्वर प्राप्तीसाठी मनाची कोणती अवस्था प्राप्त केली पाहिजे, याचे विवेचन आहे.




प्रस्तुत लेखात काही निवडक श्लोकांमधून मनास उपदेश, मोह, मायेपासून दूर जाणे, संस्कारित मन असणे अत्यावश्यक असल्याचे ज्ञान होते. आदर्श जीवन जगण्याची पद्धत समजते.

गुरूजींच्या श्लोकांमधील विचार प्रत्येकाने आचरणात आणायलाच हवेत. त्यातून मानवाचे कल्याणच होणार. तसेच गुरूजींच्या वाणीतून जगाचे खरे स्वरूप, शाश्वत सत्य समजते.

माया किंवा मोह आपल्याला बांधून ठेवते, यावर श्री गुरू तेग बहादूरजींनी भाष्य केले आहे. त्यांच्या मते, जग आणि त्यातील सुख-दुःखे क्षणभंगुर आहेत.

जग रचना सभ झूठ है, जानि लेहु रे मीत ॥
कहि नानक थिरु ना रहे, जिउ बालू की भीत ॥४९॥

अर्थ : गुरू नानक म्हणतात, "मित्रा, हे जग नश्वर आणि अस्थिर आहे. ज्याप्रमाणे वाळूची भिंत टिकत नाही, तसेच हे जगही टिकणारे नाही."

जेव्हा आपल्याला हे सत्य समजते, तेव्हा आपण भौतिक मोहातून मुक्त होतो. ही समज आपल्याला सेवा आणि निःस्वार्थ कामाकडे वळवते.

श्री गुरू तेग बहादूरजींनी मानवी दुःखाची कारणे शोधली, त्यावर मात करण्याचा मार्ग दाखवला. त्यांची शिकवण संपूर्ण मनुष्य जीवनाचे कल्याण करणारी आहे.

1. मोह आणि अहंकारावर विजय

माणसाचा स्वार्थ, अहंकार त्याला सत्यापासून दूर नेतो. यावर विजय मिळवणारा माणूस स्वतःसोबत इतरांनाही तारतो.

जो प्राणी ममता तजै,
लोभ मोह अहंकार ॥
कहु नानक आपन तरै,
अउरन लेत उधार ॥२२॥

अर्थ : गुरू नानक म्हणतात, जो माणूस लोभ, मोह, माया, ममता आणि अहंकार या विकारांचा त्याग केला तो स्वत: तर भवसागर तरून जातोच, एवढेच नव्हे तर इतरांचाही तो उद्धार करतो.

2. लोभ, क्रोधाचा त्याग

लोभ आणि राग नातेसंबंधांना तडा देतात. ज्याला सुख-दुःखाचा स्पर्श होत नाही, तो साक्षात ईश्वराचे रूप असतो.

सुख दुखु जिह परसै नही,
लोभु मोहु अभिमानु ॥
कहु नानक सुनु रे मना,
सो मुरति भगवान ॥१३॥

अर्थ : गुरू नानक म्हणतात, ज्याला सुख-दुःख स्पर्शही करू शकत नाही, जो लोभ, मोह, अभिमान आदी विकारांपासून मुक्त आहे, तो जीव साक्षात ईश्वर स्वरूप आहे.

3. सुख-दुःखात स्थिर मन

आयुष्यात चढ-उतार येणारच. पण जो शत्रू आणि मित्र दोघांना समान मानतो आणि दुःखात खचत नाही, तोच खरा ज्ञानी.

हरखु सोगु जा कै नही,
बैरी मीत समानि ॥
कहु नानक सुनि रे मना,
मुकति ताहि तै जानि ॥१५ ॥

अर्थ : गुरू नानक सांगतात, ज्याला हर्ष, शोक वेगळे वाटत नाहीत, जो शत्रू मित्र यांना समान मानतो, जो जीव मुक्त झाला आहे, असे समज.

4. भक्ती आणि नामस्मरण

सर्व संकटांतून मुक्त होण्यासाठी गुरूजींनी ईश्वराच्या नावाचे स्मरण करण्याचा सोपा मार्ग सांगितला आहे.

राम नामु उरि मैं गहिओ,
जा कै सम नहिं कोइ ॥
जिह सिमरत संकट मिटै,
दरसु तुहारो होइ ॥५७॥

अर्थ : अंत समयी गुरू नानकजी म्हणतात "अरे मित्रा ! नामस्मरणमात्रे संकटे नष्ट होतात, आणि परमेश्वराचे- दर्शन होते ते रामनाम हृद्यात धारण कर. त्याच्या तोडीचे जगात अन्य काहीही नाही."

हिंद-दी-चादर श्री. गुरू तेग बहादूरजींनी त्यांच्या कृती आणि आचरणातून सर्वांना अनमोल विचार दिला. त्यांचा विचार अंगीकारणे, आचरणात आणणे प्रत्येकाचे आद्यकर्तव्य आहेच. ‘कहु नानक सुन रे मना’ या वाक्यांद्वारे गुरूजी मनाला वारंवार अनेक दुष्कार्यापासून आपणास परावृत करून सत्कार्याशी जोडण्याचा संदेश देतात. असे गोड अमृत सर्व मानवाने चाखावे.

काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार, मत्सर यापासून मुक्तता म्हणजेच आत्मशुद्धी, सत्संग प्रधानता, जीवननिष्ठेत विधायकतेबरोबर अनाग्रही निवृत्ती, प्रपंच आणि परमार्थ, नामस्मरण यांचा सुमेळ ही गुरूजींच्या वाणीतील वैशिष्ट्ये आहेत.

त्यांचे विचार एका समाजापुरते नाहीत. तर ते सर्व मानव कल्याणाचे आहेत. मनाला संस्कारित करणारे आहेत. गुरूजींची वाणी सर्वांपर्यंत पोहोचावी. आजच्या काळात त्यांच्या विचारांचे, शिकवणीचे अनुकरण ही काळाची गरज आहे. ते अमृत प्रत्येकाने चाखल्यास जीवनाचे नक्की सार्थक होईल.

**- डॉ. श्याम टरके, सहायक संचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, लातूर**


संदर्भ

गुरू नानकांची वाणी जपुजी साहिब. ( २००६).मध्ये त. ग. विनायक लिमये. पुणे: तारासिंह गोरोवाडा, सिख धर्मप्रचार कमिटी, पुणे. ०१ / १६ / २०२६ प्राप्त

ऐक रे मना ! ( तिसरी आ.). ( २०१३). (त. ग. विनायक लिमये, अनु.) पुणे: तारासिंह गोरोवाडा, सिख धर्मप्रचार कमिटी, पुणे. ०१ / १६/ २०२६ प्राप्त आहे.

## साईबनमधील झुलता पुल पर्यटकांचे आकर्षण

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



साईबनमध्ये साहसी क्रीडा प्रकारात झिप लाईन, पाण्यावरील बलून,ऍडव्हेंचर गाड्या व बाईक बरोबर आताब्रम्हा ब्रिज, झुलता पुल सर्वच पर्यटकांचे आकर्षण ठरला आहे, येथे मनोरंजनाच्या साधनाबरोबर साहसी खेळ असल्याने मुलांचा आनंद तर द्विगुणित झाला आहे. येथील तलावाच्या वर दोन टोकाला हा पूल बांधण्यात आला असून त्यावर चालताना तो झुलतो, खाली पाणी व वर आकाश पाहताना उत्तराखंड, हिमाचल प्रदेश मध्ये असल्याचा भास होतो.

नगर मधील शिर्डी रोडवरील नागापूर एमआयडीसीच्या मागे असणार्या साईबनमध्ये हे एक नवीन आकर्षण पर्यटकांना झाले आहे मोठ्या प्रमाणात पर्यटक साईबनला येत आहेत ते याचा आनंद घेत आहेत अशा पद्धतीचा पूल नगर जिल्हात कृषी पर्यटन केंद्रात नाही.त्यामुळे क्रीडा आणि पर्यटन दोन्ही होते व लोकही मोठ्या उत्साहाने त्याचा आनंद घेत आहेत. साहसप्रेमींसाठी आता साईबन हे आवडीचे केंद्र बनत आहे व लोकांना या प्रकारचे खेळ खूप आवडतात.

## सुभाषचंद्र बोस यांचे स्वातंत्र्यासाठी मोठे योगदान

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

आझाद हिंद सेना स्थापन करुन सुभाषचंद्र बोस यांनी युवकांना प्रेरीत करण्याचे काम केले म्हणून इंग्रजांना देश सोडून लवकर जावे लागले व आपला देश स्वतंत्र झाला असल्याचे प्रतिपादन मुलिका देवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सहदेव आहेर यांनी व्यक्त केले आहे. महाविद्यालयात सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद यांच्या हस्ते बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करुण आदरांजली अर्पण करण्यात आली.

## ७ बांगलादेशी महिलांना मायदेशी परत पाठवण्याचे आदेश






**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर जिल्ह्यात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या सात बांगलादेशी महिलांना मायदेशी परत पाठवण्याचे आदेश दिले आहे. पारपत्र कायदा आणि परदेशी नागरिक कायद्यांतर्गत दोषी ठरवले असून त्यांची बांगलादेशात पाठवणी करावी असेही निकालात नमूद केले आहे.

पोलीस अधीक्षकसोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली १७ डिसेंबर रोजी ते २४ डिसेंबर दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या पथकाने नगर तालुक्यातील रुईछत्तीशी येथून बांग्लादेशी महिलांना ताब्यात घेतले होते. चौकशीमध्ये त्यांच्याकडे वैध प्रवासी कागदपत्रे नसल्याचे आढळून आले, तसेच त्यांनी भारत सरकारने अधिकृत केलेल्या मार्गाव्यतिरिक्त भारतीय सीमेमार्गे प्रवेश केला होता. सदर प्रकरणात कारवाई करताना गुन्हे नोंदवून न्यायालयात खटले दाखल करण्यात आले होते.

या सातही महिलांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपपत्र सादर केले होते. भारतीय पुरावा कायद्याच्या कलम १०६ नुसार, आरोपी महिलांनी आपण भारतीय आहोत हे सिद्ध करणे आवश्यक होते.

### समन्वय ठेवून प्रक्रिया पूर्ण

गुन्हेगारी अहवाल सदस्यता केंद्रीय गुप्तचर यंत्रणा तसेच सीमा सुरक्षा बल, कोलकाता यांच्यासोबत सतत समन्वय ठेवून प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर वरिष्ठ कार्यालयाकडुन ७ बांग्लादेशी महिलांना मायदेशी परत पाठवण्याचा आदेश प्राप्त झाला. त्यानुसार कारवाई करण्यात आली आहे.

## देहूच्या पावन भूमीवर ‘आपला मावळा ’ रणशिंग फुंकणार!

- **खासदार नीलेश लंके यांच्या उपस्थितीत २४ जानेवारीला भव्य स्वच्छता व वृक्षारोपण मोहीम**

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

संत तुकाराम महाराजांच्या पावन चरणांनी स्पर्श झालेल्या देहू नगरीत अस्वच्छता आणि पर्यावरण ऱ्हासाविरोधात थेट मैदानात उतरायची तयारी ‘आपला मावळा’ संघटनेने केली आहे. खासदार नीलेश लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने २४ जानेवारी रोजी देहूत स्वच्छता व वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येणार आहे. पवित्र देहूच्या सन्मानासाठी ही मोहीम म्हणजे एक सामाजिक लढाच ठरणार आहे.



या मोहिमेत देहू शहरातील प्रमुख रस्ते, घाट परिसर, सार्वजनिक ठिकाणे तसेच नदीकाठाची सखोल स्वच्छता करण्यात येणार आहे. केवळ कचरा उचलण्यापुरते मर्यादित न राहता, देहू परिसर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक कसा राहील, यावर भर दिला जाणार आहे. त्याचबरोबर विविध ठिकाणी वृक्षारोपण करून हिरव्या देहूचा संकल्प प्रत्यक्षात उतरविण्यात येणार आहे.

या स्वच्छता मोहिमेत आपला मावळा संघटनेचे शेकडो कार्यकर्ते, स्वयंसेवक, स्थानिक नागरिक तसेच युवक-युवती मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. देहूच्या पावन भूमीसाठी ‘मावळे’ एकदिलाने मैदानात उतरणार असून, स्वच्छतेसाठी श्रमदानातून एकजूट दाखविणार आहेत.

खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात येणार असून, यावेळी स्वच्छतेचे महत्त्व, पर्यावरण रक्षण आणि नागरिकांची जबाबदारी यावर भर देत जनजागृती करण्यात येणार आहे. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, हा संदेश या मोहिमेतून दिला जाणार आहे.

“स्वच्छ देहू – हरित देहू” या ठाम संकल्पनेतून ही मोहीम राबवली जात असून, समाजातील प्रत्येक घटकाने स्वच्छता आणि वृक्षसंवर्धनासाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात येणार आहे. पवित्र देहूच्या गौरवाला साजेसा स्वच्छ व हिरवा परिसर निर्माण करण्यासाठी ही मोहीम मैलाचा दगड ठरणार आहे. आपला मावळा संघटना आणि नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येणारी ही मोहीम सामाजिक भान, पर्यावरणाची जबाबदारी आणि सामूहिक सहभागाचे ठोस उदाहरण ठरणार असून, देहूच्या पावन भूमीवर स्वच्छतेचा आणि पर्यावरण संवर्धनाचा नवा अध्याय लिहिला जाणार आहे.

## जूनपूर्वी सरसकट कर्जमाफी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सरकार शेतकऱ्यांची कर्जमाफीची मागणी पूर्ण करणार आहे. सरकार ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देणार आहे. ३० जून २०२६ पूर्वी राज्यातील पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी केली जाईल,अशी घोषणा राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हे आमचे कर्तव्य आहे. कर्जमाफीसाठी समिती नेमण्यात आली आहे. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापर्यंत या समितीचा अहवाल प्राप्त होईल.

त्यानंतर जून महिना संपण्याच्या आत सर्व प्रक्रिया पूर्ण करून शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले जाईल," असे कृषिमंत्री भरणे यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले.

## अहिल्यानगरसह “या” जिल्ह्यांवर संकट, थेट मोठा इशारा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यातील अनेक भागात ढगाळ वातावरणासह पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे. ढगाळ वातावरणामुळे उकाडा अधिक वाढण्याची शक्यता आहे.

राज्यातील अनेक ठिकाणी तापमान ११ अंश सेल्सिअसच्या पुढे नोंदवले गेले. त्यामध्ये सध्याच्या परिस्थितीला तरी राज्यातून थंडी गायब झाल्याचे स्पष्ट आहे. पूर्वी राज्यातील पारा ५-६ अंश सेल्सिअसपर्यंत गेला होता. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, धुळे, पालघर, नाशिक, जळगाव, नंदूरबार, अहिल्यानगर आणि नाशिकमध्ये ढगाळ वातावरण असेल.



यासोबतच अवकाळी पाऊसही हजेरी लावू शकतो. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यात पुढील काही दिवसात हवामानात काही बदल होतील. मात्र, जानेवारी महिना संपायला काही दिवस शिल्लक असताना राज्यात पाऊस होताना दिसतोय.

# सिंहस्थ कुंभमेळा शिर्डीच्या विकासाची पर्वणी !

**- सुरेश पाटील, माहिती अधिकारी, उप माहिती कार्यालय, शिर्डी.**

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

त्र्यंबकेश्वर येथे आगामी २०२६-२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी केवळ कागदावर न राहता ती आता प्रत्यक्षात जमिनीवर उतरत आहे. कुंभमेळ्यासाठी नाशिकला येणारा प्रत्येक भाविक साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येतोच, हा पूर्वानुभव लक्षात घेऊन शिर्डीतील नियोजनाला नाशिकइतकेच महत्त्व प्राप्त झाले आहे. याच पार्श्वभूमीवर शिर्डी येथील साई सभागृहात नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडलेली उच्चस्तरीय आढावा बैठक प्रशासनाच्या सूक्ष्म नियोजनाची व दूरदृष्टीची साक्ष देणारी ठरली.

कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी या बैठकीत सहभागी झाले होते. बैठकीत रस्ते, हवाई वाहतूक, रेल्वे, पाणीपुरवठा व गर्दी व्यवस्थापन या विषयांवर झालेली सखोल चर्चा व नियोजन शिर्डीच्या पायाभूत सोयी - सुविधा बळकटी प्राप्त करून देणार असून नाशिक सिंहस्थ कुंभमेळा शिर्डीच्या विकासाची पर्वणी ठरणार आहे.



कुंभमेळ्यात वेळेला अनन्यसाधारण महत्त्व असते. शिर्डी विमानतळाच्या विस्तारीकरणाचा मुद्दा या बैठकीच्या केंद्रस्थानी होता. सध्या ताशी १८० प्रवासी क्षमता असलेल्या या विमानतळाची क्षमता नवीन टर्मिनलमुळे ४०० पर्यंत वाढणार आहे. मात्र, हे काम पूर्ण करण्यासाठी विमानतळ प्रशासनाने ३१ डिसेंबर २०२६ ही मुदत सांगितली असता, ती कुंभमेळ्याच्या दृष्टीने उशिराची ठरत असल्याने विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी ती अमान्य केली. प्रशासनाने कंत्राटदार व एमएडीसीची चर्चा करून हे काम कुंभमेळ्यापूर्वीच पूर्ण करण्याच्या त्यांनी सूचना दिल्या. दुसरीकडे, रेल्वे मार्गावरील ताण कमी करण्यासाठी प्रशासनाने 'कोपरगाव पॅटर्न' स्वीकारावा, असा प्रस्ताव या बैठकीत ठेवण्यात आला. शिर्डी हे रेल्वेचे अंतिम स्थानक असल्याने तिथे गाड्या वळवण्यासाठी लागणारा वेळ व मर्यादित फलाट संख्या लक्षात घेता, लांब पल्ल्याच्या गाड्या कोपरगाव स्थानकावर थांबवून तिथून बसेसद्वारे भाविकांना शिर्डीत आणण्याचे नियोजन आखण्यात आले आहे. यासाठी एस.टी. महामंडळाने कंबर कसली असून, दररोज ६८० बस फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, नाशिक शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी व भाविकांचा वेळ वाचवण्यासाठी 'शिर्डी ते त्र्यंबकेश्वर' अशी थेट बस सेवा सुरू करण्याच्या सूचना विभागीय आयुक्तांनी एस.टी महामंडळाच्या विभाग नियंत्रक यांना दिल्या.

पायाभूत सुविधांच्या बाबतीत तडजोड न करण्याची भूमिका प्रशासनाने घेतली आहे. शिर्डी - राहाता बायपासच्या चौपदरीकरणाच्या कामाचा दर्जा तपासण्यासाठी विभागीय आयुक्त स्वतः पाहणी करणार असून, कामात त्रुटी आढळल्यास ते काम पुन्हा करण्यास भाग पाडले जाईल, असे त्यांनी यावेळी सूचित केले. नगर - मनमाड या ७४ किलोमीटरच्या राष्ट्रीय महामार्गाचे काम डिसेंबर २०२६ अखेर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

कुंभमेळ्याचे सर्वात मोठे आव्हान म्हणजे गर्दी नियंत्रण. यासाठी शिर्डीत प्रथमच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. शहरातील सर्व पार्किंग झोन्स, वाहतूक मार्ग व पिकअप पॉईंट्स 'गुगल अर्थ' च्या 'केएमएल' मॅपिंगद्वारे निश्चित केले जात आहेत, जेणेकरून नियोजनात अचूकता येईल. शहरात प्रवेश करण्यापूर्वी १५ किलोमीटर आधीपासूनच मराठी, हिंदी व इंग्रजी अशा तीन भाषांमधील दिशादर्शक फलक लावले जातील. हे फलक रात्रीच्या वेळीही स्पष्ट दिसतील अशा 'रेट्रो-रिफ्लेक्टिव्ह' स्वरूपाचे असतील. विशेष म्हणजे, कोणत्या पार्किंगमध्ये किती जागा शिल्लक आहे, हे सांगण्यासाठी शहराच्या वेशीवरच ५ ठिकाणी 'व्हेरिएबल मेसेज डिस्प्ले' म्हणजेच डिजिटल स्क्रीन्स उभारण्यात येणार आहेत. यामुळे भाविकांची होणारी फरफट थांबेल व वाहतूक कोंडी टळेल. प्रशासनाने केवळ पर्वणीच्या (शाही स्नान) दिवसांचा विचार न करता, सामान्य दिवसांसाठी वाहतुकीचे लवचिक धोरण अवलंबले आहे. गर्दी नसताना भाविकांना थेट मंदिर परिसरापर्यंत वाहने नेण्याची मुभा देणे व आवश्यकतेनुसार फलक झाकण्याची व्यवस्था करणे, हे या 'स्मार्ट' नियोजनाचे वैशिष्ट्य आहे.

मूलभूत सुविधा : पाणी, वीज व स्वच्छता भाविकांच्या आरोग्याची व स्वच्छतेची काळजी घेण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. शिर्डीची वाढती तहान भागवण्यासाठी 'निळवंडे' धरणाच्या कालव्यावरून अतिरिक्त पाणी उचलण्याचे नियोजन असून, टँकरमुक्त पुरवठ्यासाठी पार्किंग क्षेत्रात पाईपलाईनचे जाळे विणले जाणार आहे. स्वच्छतेसाठी आगळावेगळा निर्णय घेत, पार्किंगमधील प्रचंड कचरा उचलण्यासाठी घंटागाडीऐवजी थेट ट्रॅक्टरचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासाठी ५०० अतिरिक्त सफाई कामगारांची फौज तैनात असेल. अखंडित वीज पुरवठ्यासाठी कोपरगाव सबस्टेशनला पर्याय म्हणून बाभळेश्वर येथून ६ किलोमीटरची स्वतंत्र 'बॅकअप लाईन' टाकली जात आहे. आपत्कालीन परिस्थितीसाठी १४ अग्निशमन बंब व १४० प्रशिक्षित जवानांची मागणी नाशिकच्या प्रस्तावासोबत करण्यात आली आहे. मोबाईल नेटवर्क सुरळीत राहण्यासाठी १४ तात्पुरते टॉवर्स व ५ फिरते टॉवर्स उभारून कनेक्टिव्हिटीचे जाळे अधिक घट्ट केले जाणार आहे.

'शनिशिंगणापूरसाठी स्वतंत्र वाहतूक आराखडा : शनिशिंगणापूरसाठी स्वतंत्र वाहतूक आराखडा

कुंभमेळ्याच्या काळात शिर्डीसोबतच श्री क्षेत्र शनि - शिंगणापूर येथेही भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने शनि - शिंगणापूरसाठीही स्वतंत्र 'वाहतूक व्यवस्थापन आराखडा' तयार करण्यात आला आहे. अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर व शिर्डी या तीनही प्रमुख मार्गांवरून येणाऱ्या वाहनांचे नियोजन करण्यासाठी 'आउटर पार्किंग' (P1 आणि P2) ची व्यवस्था करण्यात आली आहे. मंदिराच्या जवळ होणारी गर्दी टाळण्यासाठी खाजगी वाहने या बाहेरील वाहनतळांवरच थांबवण्यात येतील. तेथून भाविकांना मंदिराकडे नेण्यासाठी विशिष्ट 'पिक - अप व ड्रॉपिंग पॉइंट्स' निश्चित करण्यात आले आहेत. सोनई, घोडेगाव व राहुरी या भागातून येणाऱ्या वाहतुकीचा विचार करून प्रवेश व निर्गमन मार्ग अशा प्रकारे आखले आहेत की, जेणेकरून महामार्गावर कोठेही वाहतूक कोंडी होणार नाही. दर्शन रांगेतील भाविकांचा ओघ सुरळीत राहील.

एकंदरीत, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली शिर्डीत सुरू असलेला हा नियोजनाचा महायज्ञ, आगामी सिंहस्थ कुंभमेळा केवळ एक धार्मिक सोहळा न राहता, तो सुव्यवस्थापन व सुरक्षिततेचा एक आदर्श वस्तुपाठ ठरेल, याची ग्वाही देत आहे.

# महिलांनी विवेकी डोळसपणा स्विकारावा : माधवराव हुडेकर

**बुलडाणा : (समर्थ गांवकरी)**






महिलांनी आधुनिकीकरण स्वीकारले पाहिजे. शिक्षणासारखे मोठे माध्यम त्यांना आता खुले झाले आहे. महापुरुषांनी केलेल्या प्रयत्नातून महिलांचे जीवन सुखकर झाले आहे.आधुनिकतेची व ज्ञानार्जनाची कास धरण्या सोबत आपण डोळस,विवेकी झाले पाहिजे असे प्रतिपादन जेस्ट सामाजिक कार्यकर्ते माधवराव हुडेकर यांनी केले. महिला सन्मान आठवड्या निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

शिवसाई परिवार व माणस फाउंडेशन च्या वतीने महिलांसाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.आठवडाभर महिला सक्षमीकरणाचा जागर घातला जात आहे.त्याचाच एक भाग म्हणून 22 जाणे.रोजी सागवान येथे आयोजित कार्यक्रमात हुडेकर यांनी महिलांशी संवाद साधला. कार्यक्रमाचे अध्यक्ष माधवराव हुडेकर होते तर प्रा. डी एस लहाने,प्राचार्य शाहीणा पठाण, ज्योती पाटील, प्रतिभा भुतेकर ,मनीषा वारे आणिता कापरे आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना हुडेकर म्हणाले फुले, शाहू, सावित्रीबाईंनी महिलांसाठी महत्त्वपूर्ण काम केले याचे स्मरण आपण ठेवले पाहिजे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. शिक्षणाची कास आपण धरल्यास आयुष्यामध्ये बदल व्हायला वेळ लागत नाही.अनिष्ट रूढी परंपरा चा सर्वाधिक त्रास महिलांनाच झाला आहे. अनिष्ट रुढीचा त्याग करून आपण कुटुंबात विवेकवाद रुजवावा असे ते म्हणाले .यावेळी प्रा. डी एस लहाने यांनी आयोजनामागची भूमिका मांडली तर शाहिनाताई पठाण यांनी अनुरूप विचार व्यक्त केले.



ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीदिनी व हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीदिनी त्यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपायुक्त उमेश बिरारी, कार्मिक अधिकारी दयानंद गुंडप यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिन असून या अनुषंगाने आज मतदानाची शपथ घेण्यात आली. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### जिल्हा परिषद ठाणे येथे लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ

**ठाणे (स. गांवकरी) :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार तसेच उपरोक्त संदर्भिय पत्राअन्वये राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून लोकशाही मूल्यांप्रती निष्ठा ठेवण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद ठाणे येथे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ देण्यात आली. या अनुषंगाने जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत सर्व शासकीय कार्यालयांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आज, दि. २३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा परिषद इमारतीच्या आवारात शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास जिल्हा परिषद कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय मतदार दिनाचे महत्व अधोरेखित करताना, लोकशाही व्यवस्थेवर दृढ विश्वास ठेवणे, संविधानिक मूल्यांचे पालन करणे, मुक्त व निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे तसेच मतदानाचा हक्क बजावणे, या बाबींविषयी उपस्थितांना शपथ देण्यात आली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी अंजली अंबेकर, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय किर्ती डोईजोडे, लेखाधिकारी रविंद्र सकपाळ, सहाय्यक प्रशासन अधिकारी श्रीकांत खंडागळे, कनिष्ठ सहाय्यक लेखाधिकारी मनोज देवकर, ग्रामपंचायत अधिकारी हिरामण खाडे तसेच जिल्हा परिषद ठाणे येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमातून लोकशाही मूल्यांचे संवर्धन, नवमतदारांमध्ये जागृती निर्माण करणे तसेच नागरिकांमध्ये मतदानाविषयी सकारात्मक दृष्टिकोन वाढविणे, हा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

### १० किलो ड्रग्ज पारनेरमध्ये कुणाच्या घरात होते..? डॉ. सुजय विखे पाटील

**अहिल्यानगर (स. गांवकरी) :** अहिल्यानगरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस कर्मचाऱ्याला मंगळवारी अटक झाली. पुणे जिल्ह्यातील ड्रग्ज रॅकेटच्या संशयावरुन पुणे पोलिसांनी शामसुंदर गुजर या पोलिसाला चौकशीसाठी ताब्यात घेतले. गुजर हा सध्या अहिल्यानगर एलसीबीत कार्यरत आहे. तो पूर्वी पारनेर पोलिस ठाण्यात कार्यरत होता. पारनेरच्या बॉण्ड्रीवरील पुणे जिल्ह्यातील शिरुरमध्ये ड्रग्जच रॅकेट सापडलं. त्याचे धागेदोरे थेट पारनेर व नगरपर्यंत पोहोचले. पारनेर आणि ड्रग्ज हे समीकरण उघड झालं. अहिल्यानगरच्या पोलिस अधिक्षकांनी या प्रकरणाच्या तपासातील सगळं सत्य पत्रकारांना सांगावं, अशी अपेक्षा माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केली. विखेंनी या प्रकरणावर काही गंभीर शंकाही उपस्थित केल्या. ड्रग्ज सारख्या गंभीर प्रकरणात, नगरमधील पोलिस कर्मचाऱ्याला पुणे पोलिसांनी ताब्यात घेतले. याबाबत पत्रकारांनी डॉ. सुजय विखे पाटील यांना प्रश्न विचारला. या प्रकरणात आपली भूमिका काय, असा सवाल पत्रकारांनी विखेंना विचारला. त्यावर डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिलेल्या उत्तराने, अनेकांच्या भुवया उंचावल्या. सुजय विखे म्हणाले, ड्रग्ज प्रकरणात ताब्यात घेतलेला पोलिस कर्मचारी हा पारनेर पोलिस ठाण्यात कार्यरत होता. त्यावेळी तेथील अवैध व्यावसायिकांसोबत त्यांचे संबंध होते. इतरही अनेक गंभीर प्रकरणात त्याचा सहभाग होता. त्याच्याविरोधात पोलिस अधिक्षकांकडे तक्रारी करुन त्याची बदली करण्याची मागणीही त्यावेळी झाली होती. वादग्रस्त असलेल्या या पोलिसाची बदली थेट नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेत झाली.

# अयोध्या श्रीराम मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठापना वर्धापन दिन साजरा

## वारकरी साधकांचा हरिनाम गजरात हरिपाठ ; रामरक्षास्तोत्र या ग्रंथाचे वाटप

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**



येथील श्री आवेकर भावे श्री रामचंद्र संस्थान आळंदी ( श्री राम मंदिर ) यांचे वतीने अयोध्या श्रीराम मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठापना वर्धापन दिन साजरा करण्यात आला. अयोध्येत दोन वर्षा पूर्वी श्री प्रभू रामचंद्रांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठापना वेदमंत्र जयघोषात झाली. मूर्ती प्राणप्रतिष्ठापना आणि मंदिर निर्माण कार्य लोकार्पण सोहळ्याचे वर्धापना निमित्त इंद्रायणी नदी काठावरील श्री राम मंदिरात गुरुवारी ( दि. २२ ) धार्मिक प्रथापरंपरांचे पालन करीत उत्साहात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

अयोध्या श्रीराम मंदिर वर्धापन दिन आळंदीत उत्साहात साजरा करण्यात आला. जो प्राणप्रतिष्ठा समारोह अयोध्ये मध्ये झाला. त्या वर्धापना निमित्त हरिपाठ हरिनाम गजरात धार्मिक प्रथा परंपरांचे पालन करीत श्रीरामकृष्ण वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह. भ. प. मोहन महाराज शिंदे यांचे संस्थेतील साधकांनी सेवा रुजू केली. आवेकर - भावे श्री रामचंद्र संस्थानचे वतीने कार्यक्रमाचे संयोजन विश्वस्त अर्जुन मेदनकर यांनी केले. हरिपाठ सेवेचे प्रसंगी ह. भ. प. रामचंद्र महाराज सारंग, ह. भ. प. रवींद्र भूमकर यांनी नियोजन केले. या प्रसंगी श्रींचे पुजारी महेश अयाचित, माऊलींचे पालखी सोहळ्याचे मानकरी ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, गोविंद ठाकूर तौर, आळंदी धाम सेवा संस्थेचे रोहिदास कदम, लक्ष्मण मेदनकर आदी मान्यवर उपस्थित होते. भारत देश त्यातही महाराष्ट्र ही संतांची वारकरी संप्रदायाची भूमी असून या भूमीमध्ये देवाधिकांची संताधिकांची उपासना त्या त्या दिनी त्या त्या प्रसंगी मोठ्या आनंदाने करून त्या हरिपाठ, वेदमंत्र जयघोष, श्रींची आरती, प्रथा परंपरांचे पालन करीत सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून आनंद घेता घेता आनंद देण्याचा प्रयत्न महाराष्ट्रातील जनता करत असते. याच अनुषंगाने मागील दोन वर्षा पूर्वी २२ जानेवारीला अयोध्येमध्ये श्री राम लल्ला यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापणा धार्मिक मंगलमय वातावरणात झाली होती. अनेक वर्षांच्या लढ्यातून मागील २२ जानेवारी २०२४ या ऐतिहासिक दिनी मंदिराचे ही लोकार्पण झाले. त्या दिनाला ऐतिहासिकता आहे. याच भूमिकेतून झालेल्या वैभवी प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याचे वर्धापन दिना निमित्त आवेकर भावे रामचंद्र संस्थान आळंदी यांचे वतीने मोठ्या उत्साहात हरिपाठ आदी कार्यक्रमांचे माध्यमातून जवळ जवळ येणाऱ्या सगळ्याच भाविकांना सार्थ स्वरूपाची रामरक्षा या ग्रंथाचे वाटप, प्रसाद म्हणून लाडू भाविकांना साधकांना वाटप करण्यात आले.



## स्वारातीम विद्यापीठात नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे जयंती साजरी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये आज शुक्रवार, दि.२३ जानेवारी, २०२६ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, ज्ञानस्तोत्र केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. सुहास पाठक, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, डॉ. लक्ष्मीकांत आगलावे, सुनील जाधव, शिवाजी चांदणे व नारायण गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# शिर्डीतील ११५७ बांधकाम मजुरांना मिळाले 'सुरक्षा कवच'

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संकल्पना

देशभरातून येणाऱ्या साईभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या शिर्डीत विकासाची कामे वेगाने सुरू असतानाच, या विकासाचे शिल्पकार असलेल्या बांधकाम मजुरांच्या सुरक्षेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र शासनाचा कामगार विभाग, गोदरेज कंपनी व त्यांच्या सहयोगी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत शिर्डीतील ११५७ बांधकाम कामगारांची अधिकृत नोंदणी पूर्ण करण्यात आली आहे. या कामगारांना सुरक्षा साहित्य व ओळखपत्र प्रदान करण्यात आले असून, त्यांच्या कल्याणासाठी शासकीय निधीही उपलब्ध करून देण्यात आला आहे. बांधकाम क्षेत्रात काम करणारे मजूर अनेकदा स्थलांतरित असतात. ओळखपत्रांचा अभाव व क्लिष्ट प्रक्रियेमुळे ते शासकीय लाभांपासून वंचित राहतात. ही अडचण ओळखून प्रशासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'सामाजिक सुरक्षा' या संकल्पनेवर भर दिला आहे. या उपक्रमांतर्गत मजुरांना केवळ नोंदणीकृतच केले नाही, तर त्यांना बांधकाम कामगार मंडळ ओळखपत्र देऊन अधिकृत दर्जा मिळवून दिला आहे. मजुरांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासनाने शिर्डीत विशेष जनजागृती शिबिरे आयोजित केली. यामध्ये कामगारांना प्रत्यक्ष मदत, मार्गदर्शन, समुपदेशन व आरोग्य तपासणी अशा विविध टप्प्यांतून साहाय्य पुरवण्यात आले. कामगारांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देत, त्यांना आरोग्य सुविधा व कामाच्या ठिकाणी सुरक्षितता प्रदान करणे हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट होते. शासनाच्या या सकारात्मक हस्तक्षेपामुळे शिर्डीतील बांधकाम मजुरांना आता हक्काचे 'सुरक्षा कवच' मिळाले असून, शासकीय निधीतून त्यांच्या भविष्यातील आर्थिक व सामाजिक सुरक्षेचा मार्ग अधिक प्रशस्त झाला आहे.

# सौर–पवन हायब्रिडने आदिवासी झेंडीगुडा गावात १७ वर्षानंतर वीजस्वप्न साकार : डॉ. भूपेश नेम्माणिवार यांच्या प्रयत्नांना यश

**किनवट : (समर्थ गांवकरी)**



महाराष्ट्र तेलंगणा सीमेवरील अत्यंत दुर्गम आदिवासी गाव झेंडीगुडा येथे "Empowering Tribes: Solar–Wind Hybrid Mini Grid Database for Sustainable Electrification या प्रमुख संशोधन प्रकल्पाच्या ऑनसाइट भेटीचे आयोजन सोमवार, १९ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले. हा प्रकल्प दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर येथील भौतिकशास्त्र विभागप्रमुख व या प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. भूपेश नेमानीवार, यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पाला राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग (RGST), मुंबई यांची Major Research Project अंतर्गत मंजुरी मिळालेली आहे.

या ऑनसाइट भेटीदरम्यान शास्त्रज्ञ डॉ. दिनेश जगताप , वैज्ञानिक अधिकारी, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, मुंबई तसेच प्रा. संजय पेक्कमवार, RGST समन्वयक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी प्रकल्पस्थळी प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी प्रकल्पाच्या तांत्रिक बाबी, कार्यक्षमता, टिकावू स्वरूप आणि आदिवासी जीवनावर होणारा सकारात्मक परिणाम यांचा सविस्तर आढावा घेतला.

झेंडीगुडा हे गाव किनवटपासून सुमारे ४५ किमी अंतरावर असून महाराष्ट्र–तेलंगणा सीमेपासून केवळ ३ किमी अंतरावर आहे. अतिदुर्गम व डोंगराळ भागातील गेल्या १७ वर्षांपासून वीजपुरवठ्यापासून वंचित असलेल्या या आदिवासी भागासाठी हा प्रकल्प आशेचा किरण ठरला आहे. सौर आणि पवन ऊर्जेच्या संयोगातून उभारण्यात आलेला हा पहिल्यांदाच राबविण्यात आलेला हायब्रिड मिनी ग्रीड प्रकल्प असून त्यामार्फत २० आदिवासी घरांना थेट वीजपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

या वेळी गावातील गोंड आदिवासी बांधवांनी आपल्या पारंपरिक नृत्यसादरीकरणाद्वारे पाहुण्यांचे जल्लोषात स्वागत केले. कार्यक्रमाला सरपंच देवराव धुर्वे, स्थानिक आदिवासी ग्रामस्थ, तसेच प्रा. साईनाथ पांचाळ आणि प्रा. सौरव राऊलवार यांची उपस्थिती लाभली.

प्रकल्पामुळे लाभार्थी आदिवासी कुटुंबांमध्ये आनंदाचे वातावरण असून, "वीज म्हणजे फक्त दिवा नव्हे तर शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता आणि आधुनिक जगाशी जोडणारा पूल" अशी भावना त्यांनी व्यक्त केली. अंधारातून प्रकाशाकडे नेणारा हा उपक्रम त्यांच्या दैनंदिन जीवनात आमूलाग्र बदल घडवत आहे.

अशा प्रकारचे थेट लाभ देणारे, तळागाळातील खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचणारे प्रकल्प अत्यंत मोजके असतात. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि खऱ्या अर्थाने सशक्त करण्यासाठी हा प्रकल्प एक आदर्श व प्रेरणादायी मॉडेल ठरत आहे.

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.काવિ/जन्म/मृत्यु नोंद/०८/२०२६ अकोले दि. २३/०१/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. दिनकर काशिनाथ भांगरे, रा. पिंपळदरावाडी**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांची आई कै. गंगुबाई काशिनाथ भांगरे यांचा मृत्यू दि. २०/०२/२०१६** रोजी **मौजे पिंपळदरावाडी** येथे झाला असुन त्यांच्या **आईच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय पिंपळदरावाडी**, ता.अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. दिनकर काशिनाथ भांगरे, रा. पिंपळदरावाडी**, ता. अकोले जि. अहिल्यानगर **अर्जदार यांची आई कै. गंगुबाई काशिनाथ भांगरे यांचा मृत्यू दि. २०/०२/२०१६** रोजी **मौजे पिंपळदरावाडी** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय पिंपळदरावाडी**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. २३/०१/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

हुकूमावरुन,
कामगिरी क्लर्क
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले

# गुरु तेगबहादूरजी यांच्या ३५० व्या शहिदी समारंभानिमित्त वक्तृत्व स्पर्धा संपन्न

**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**



'हिंद दी चादर' श्री गुरु तेगबहादूरजी यांच्या ३५० व्या शहिदी समारंभानिमित्त स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये आंतरराष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा गुरुवार, दि.२२ जानेवारी, २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेचे उद्घाटन गुरुद्वारा सचखंड हजूर साहिब, नांदेड येथील मुख्य जत्थेदार सिंघ साहेब संत बाबा कुलवंतसिंघजी यांच्या शुभहस्ते झाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गुरुद्वारा सचखंड हजूर साहिबचे सहायक जत्थेदार सिंघ साहेब रामसिंघजी, लंगर साहिबचे बाबा बलविंदरसिंघजी तसेच कार्यक्रमाचे यजमान व महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री कार्यालयाचे डेस्क प्रमुख ओएसडी रामेश्वर नाईक उपस्थित होते. कार्यक्रमाला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, गुरुद्वारा सचखंड बोर्डाचे प्रशासक, 'हिंद दी चादर ३५० वा शहिदी समारंभ' क्षेत्रीय समन्वय समितीचे प्रमुख डॉ. विजय सतबीरसिंघजी यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.

"गुरु तेगबहादूरजी की ३५०वीं शहिदी समारंभ... एक प्रेरणा" या विषयावर आधारित या आंतरराष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेत देश-विदेशातील एकूण २०७ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन व ऑफलाईन माध्यमातून सहभाग नोंदवला. यापैकी निरीक्षक समितीने १०० विद्यार्थ्यांची अंतिम निवड केली. स्पर्धा दोन गटांमध्ये घेण्यात आली. पहिला गट पाचवी ते बारावी, तर दुसरा गट पदवी ते विद्यावाचस्पती (पीएच.डी.) असा होता.

पहिल्या गटामध्ये प्रथम क्रमांक चरणजीतकौर गिल, द्वितीय क्रमांक अविष वाघमारे आणि तृतीय क्रमांक आर्या दरडे यांनी पटकावला. या गटातील प्रोत्साहनपर पारितोषिके साची कुलकर्णी व युवक वाटोळे यांना प्रदान करण्यात आली. दुसऱ्या गटामध्ये प्रथम क्रमांक साक्षी बर्गे, द्वितीय क्रमांक किरपाल सिंघ तवाना आणि तृतीय क्रमांक प्राजक्ता वाठोरे यांनी मिळवला. या गटातील प्रोत्साहनपर पारितोषिके जगतारकौर महंत व जीत तोष्णीवाल यांना देण्यात आली.

ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक सुरभी कन्सल आणि द्वितीय क्रमांक स्मिता स्वामी यांनी मिळवला. स्पर्धेचे प्रथम पारितोषिक रोख २५,००० रुपये, द्वितीय पारितोषिक १५,००० रुपये तर तृतीय पारितोषिक १०,००० रुपये असे होते.

स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी गुरु तेगबहादूरजी यांच्या महान बलिदानाचे महत्त्व, धार्मिक सहिष्णुता, मूल्याधिष्ठित जीवन, देशभक्ती व त्याग यांसारख्या विषयांवर प्रभावी विचार मांडले.

स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी गुरु तेगबहादूरजी यांच्या महान बलिदानाचे महत्त्व, धार्मिक सहिष्णुता, मूल्याधिष्ठित जीवन, देशभक्ती व त्याग यांसारख्या विषयांवर प्रभावी विचार मांडले. उत्कृष्ट वक्तृत्व सादर करणाऱ्या सहा विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. गुंजन अग्रवाल व सिमरन प्रेमचंदानी यांनी केले, तर कार्यक्रमाची प्रस्तावना व संयोजन डॉ. प्रकाश निहलानी यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# राष्ट्रीय सेवा योजना शिबीर श्रमसंस्काराची पाठशाळा

- सचिन पाटील वराळ
- अळकुटी महाविद्यालयाच्या रासेयो विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा म्हस्केवाडी येथे समारोप

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

विखे पाटील परिवाराने प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून अळकुटीसारख्या ग्रामीण भागात उच्च शिक्षणाची दारे सर्वसामान्यांसाठी खुली केली. विखे पाटील परिवाराच्या विचारांचा वसा आणि वारसा जोपासण्याचे काम अळकुटी महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिरातून होत आहे. राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ उपक्रम नसून ती विद्यार्थ्यांना समाजाभिमुख बनवणारी चळवळ आहे. शिक्षणासोबत समाजसेवेची जोड देऊन राष्ट्रनिर्मितीत युवकांचा सहभाग वाढवणे हे तिचे खरे उद्दिष्ट आहे. एकूणच राष्ट्रीय सेवा योजना शिबीर श्रमसंस्काराची पाठशाळाच आहे, असे प्रतिपादन संदीप पाटील वराळ जनसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांनी केले.



लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर १६ जानेवारी ते २२ जानेवारी २०२६ या कालावधीकरिता मौजे, म्हस्केवाडी ता. पारनेर येथे उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानाहून बोलताना सचिन वराळ पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक व प्राध्यापकांचे कौतुक केले. याप्रसंगी पंचायत समिती सदस्य दिनेशदादा बाबर, प्राचार्य डॉ. कुंदा कवडे, वि.का.से.सो. चेअरमन नवनाथ म्हस्के, विघ्नहर पतसंस्था चेअरमन सुदाम म्हस्के, माजी विद्यार्थी प्रशांत पानमंद, स्वयंसेवक विद्यार्थी आयान तांबोळी व तनिष्का खुपटे आदींनी आपली मनोगते व्यक्त केली.

याप्रसंगी म्हस्केवाडीचे मा. सरपंच किरण पानमंद यांनी म्हस्केवाडी ग्रामस्थांच्या वतीने प्रमुख पाहुणे सचिन पाटील वराळ, दिनेशदादा बाबर, अतुलजी माने, संग्रामजी पावडे, प्राचार्य डॉ. कुंदा कवडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अर्जुन चाटे, प्रा. पुजा वैरागर, प्रा. पोपट सुंबरे, डॉ. शांताबाई थोरात, प्रा. राजाराम गोरडे आदींचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला. या शिबिराच्या समारोपाप्रसंगी विघ्नहर पतसंस्था चेअरमन सुदाम म्हस्के, मा. सरपंच किरण पानमंद, श्री गणेश देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष भाऊसाहेब गोरडे, श्री गणेश देवस्थान ट्रस्ट उपाध्यक्ष बाळासाहेब म्हस्के, वि.का.से.सो. चेअरमन नवनाथ म्हस्के, वि.का. से.सो. संचालक शिवाजी म्हस्के, विघ्नहर पतसंस्था व्हा. चेअरमन सुनील पानमंद, माधवतात्या गोरडे, सेवानिवृत्त शिक्षक मनाजी म्हस्के, वि.का.से.सो. व्हा. चेअरमन संतोष पानमंद, योगा शिक्षक लक्ष्मण म्हस्के, गोविंद म्हस्के, सामाजिक कार्यकर्ते रामदास म्हस्के, शिवाजी म्हस्के, जिल्हा परिषद शाळा मुख्याध्यापक जगदाळे सर, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अर्जुन चाटे, प्रा.पूजा वैरागर, प्रा. पोपट सुंबरे, डॉ. शांताबाई थोरात, प्रा. राजाराम गोरडे, प्रा. विशाल रोकडे, सूर्यमाला भोर आदी ग्रामस्थ, प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत रासेयो सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट सुंबरे यांनी केले, सूत्रसंचालन रासेयो सदस्य प्रा. विशाल रोकडे यांनी केले तर आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.अर्जुन चाटे यांनी केले.

# वासिंद येथे कै. विठ्ठल गोविंद भेरे प्रतिष्ठानच्या अभ्यासिकेचा २६ जानेवारी रोजी शुभारंभ!

**वासिंद : (समर्थ गांवकरी)**

शालेय व विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कै. विठ्ठल गोविंद भेरे प्रतिष्ठान, वासिंद यांच्या वतीने नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या अभ्यासिकेचा शुभारंभ सोहळा सोमवार, दि. 26 जानेवारी 2026 रोजी सकाळी 11.00 वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या अभ्यासिकेची स्थापना 31 जुलै 2025 रोजी करण्यात आली होती, विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी शांत, सुरक्षित व सुसज्ज वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे.

या शुभारंभ कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. चिन्मयजी पालेकर साहेब (PRO, JSW वासिंद), प्रा. डॉ. दिलीप चौधरी सर (M.Com, Ph.D.), डॉ.




भरत तारमळे सर (डेप्युटी मॅनेजर, निमकरटेक टेक्निकल सर्व्हिसेस प्रा. लि.) तसेच श्री. राजेंद्र म्हसकर साहेब (सरपंच, ग्रामपंचायत वासिंद) उपस्थित राहणार आहेत.

अभ्यासिकेची वैशिष्ट्ये लक्षवेधी असून मुलींसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था, ग्रुप स्टडी व जेवणासाठी स्वतंत्र केबिन, वर्तमानपत्र सुविधा, CCTV नियंत्रण, स्पर्धा परीक्षांसाठी संदर्भ पुस्तके तसेच तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून नियमित मार्गदर्शन यांचा समावेश आहे.

या अभ्यासिकेच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी योग्य दिशा मिळेल, असा विश्वास प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्यासाठी श्री. राजेंद्र विठ्ठल भेरे (उपाध्यक्ष) व श्री. रविंद्र विठ्ठल भेरे (अध्यक्ष) यांच्यासह कै. विठ्ठल गोविंद भेरे प्रतिष्ठान, वासिंदचे सर्व सदस्यांनी आवाहन केले आहे.

पत्ता : सचिन अपार्टमेंट, तळमजला, चौबळ वाडा, वॉर्ड क्र. 6, जुना आग्रा रोड, वासिंद (पश्चिम), ता. शहापूर, जि. ठाणे.

संपर्क : 8983355615 / 9226795497

# शिर्डीतील गुन्हेगारी आधी थांबवा, मग पारनेरवर टीका करा



## खासदार निलेश लंके यांचा सुजय विखेंवर घणाघात!

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राजकीय नेते मंडळींना निलेश लंके यांचे नाव घेतल्याशिवाय दिवस जात नाही, अशी टीका करत खासदार निलेश लंके यांनी भाजप नेते सुजय विखे यांच्यावर गंभीर आरोपांची झडती घेतली आहे.

या जिल्ह्यात पारनेरला बदनाम करण्यापेक्षा शिर्डीमध्ये नेमके काय सुरू आहे, याकडे लक्ष द्यावे, असे सांगत लंके यांनी स्पष्ट शब्दांत भूमिका मांडली. शिर्डीतील अन्नछत्रामुळे गुन्हेगारी वाढली, असे केविलवाणे वक्तव्य सुजय विखे यांनी केले होते, असा आरोपही त्यांनी केला.

खासदार लंके म्हणाले की, शिर्डीमध्ये व्यवसायासाठी आलेल्या एका गरीब शेतकरी कुटुंबातील तरुणाचा निर्घृण खून झाला.

या खुनातील आरोपी दीपक पोकळे हा सुजय विखे यांचा कार्यकर्ता असून त्याच्यावर तब्बल १८ गुन्हे दाखल होते. इतकेच नव्हे तर आरोपीच्या कार्यालयाच्या उद्घाटनाला स्वतः सुजय विखे उपस्थित होते, असा दावाही त्यांनी केला.

"पहिले शिर्डीतील गुन्हेगारी थांबवा, नंतर पारनेरला बदनाम करा," असा थेट सवाल करत लंके यांनी विखेंना लक्ष्य केले. तसेच गोवरसारखा फायनान्स घोटाळा समोर आला असून त्यातील आरोपीही विखे यांचाच कार्यकर्ता असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

या वक्तव्यामुळे शिर्डी आणि पारनेर परिसरातील राजकारण पुन्हा तापण्याची चिन्हे दिसत असून, या आरोपांवर सुजय विखे काय भूमिका मांडतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# राष्ट्रमाता जिजाऊ जयंती साजरी

**नविन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

दि २२ जानेवारी रोजी छत्रपती शहाजी राजे चौक पांडुरंग आपर्टमेंट येथे जिजाऊ प्रतिमेचे पुजन करून पुष्प हार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली. या वेळी सामाजिक व राजकीय पत्रकारीता क्षेत्रातील मान्यवरांचा या मध्ये जेष्ठ नागरीक व्यंकटराव मोरे . शिवसेना ओबीसी जिल्हाप्रमुख तथा व्हॉईस ऑफ मिडीया पत्रकार संघाचे नांदेड जिल्हा सचिव अनिल पाटील धमने . मराठा सेवक श्याम पाटील वडजे . लक्ष्मीकांत पत्तेवार . उदयसिंह कच्छवे . विजय पांचाळ . सुनिता चौहाण . आदींचा शाल श्रीफळ जिजाऊ ग्रंथ देऊन सत्कार सन्मान छावा श्रमिक संघटना मराठवाडा अध्यक्ष तथा जिजाऊ प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष भास्कर हंबर्डे . सौ माधुरी हंबर्डे .अजिंक्य हंबर्डे यांच्या वतीने करण्यात आला आहे.

# १० किलो ड्रग्ज पारनेरमध्ये कुणाच्या घरात होते..?

## डॉ. सुजय विखे पाटील यांनी उपस्थित केला प्रश्न!

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस कर्मचाऱ्याला मंगळवारी अटक झाली. पुणे जिल्ह्यातील ड्रग्ज रॅकेटच्या संशयावरुन पुणे पोलिसांनी शामसुंदर गुजर या पोलिसाला चौकशीसाठी ताब्यात घेतले. गुजर हा सध्या अहिल्यानगर एलसीबीत कार्यरत आहे. तो पूर्वी पारनेर पोलिस ठाण्यात कार्यरत होता. पारनेरच्या बॉण्ड्रीवरील पुणे जिल्ह्यातील शिरुरमध्ये ड्रग्जच रॅकेट सापडलं. त्याचे धागेदोरे थेट पारनेर व नगरपर्यंत पोहोचले. पारनेर आणि ड्रग्ज हे समीकरण उघड झालं. अहिल्यानगरच्या पोलिस अधिक्षकांनी या प्रकरणाच्या तपासातील सगळं सत्य पत्रकारांना सांगावं, अशी अपेक्षा माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केली. विखेंनी या प्रकरणावर काही गंभीर शंकाही उपस्थित केल्या.

ड्रग्ज सारख्या गंभीर प्रकरणात, नगरमधील पोलिस कर्मचाऱ्याला पुणे पोलिसांनी ताब्यात घेतले. याबाबत पत्रकारांनी डॉ. सुजय विखे पाटील यांना प्रश्न विचारला. या प्रकरणात आपली भूमिका काय, असा सवाल पत्रकारांनी विखेंना विचारला. त्यावर डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिलेल्या उत्तराने, अनेकांच्या भुवया उंचावल्या. सुजय विखे म्हणाले, ड्रग्ज प्रकरणात ताब्यात घेतलेला पोलिस कर्मचारी हा पारनेर पोलिस ठाण्यात कार्यरत होता. त्यावेळी तेथील अवैध व्यावसायिकांसोबत त्यांचे संबंध होते. इतरही अनेक गंभीर प्रकरणात त्याचा सहभाग होता. त्याच्याविरोधात पोलिस अधिक्षकांकडे तक्रारी करुन त्याची बदली करण्याची मागणीही त्यावेळी झाली होती. वादग्रस्त असलेल्या या पोलिसाची बदली थेट नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेत झाली. म्हणजेच त्याच्या डोक्यावर कोणत्यातरी मोठ्या नेत्याचा हात होता. एकीकडे एसपी स्थानिक गुन्हे शाखेत इमानदार पोलिस घेतल्याचे सांगतात. मग त्या वादग्रस्त पोलिसाला थेट एलसीबीत कुणाच्या सांगण्यावरुन घेतलं गेलं, हे पोलिस अधिक्षकांनी सांगावं. आत्ताच्या ड्रग्ज प्रकरणात 10 किलो ड्रग्ज हे पारनेरमधील दोघांच्या घरी ठेवले



गेले होते. मग ते कुणाच्या घरात होते? त्यांची नावं पोलिस का सांगत नाहीत. ज्यांच्या घरात हे 10 किलो ड्रग्ज होते, ते कुणाचे कार्यकर्ते होते? त्यांची नावं गुन्ह्यात येऊ नये म्हणून पोलिस ठाण्यात कोण अर्धा तास बसून होतं? हे सगळं मला माहित आहे. परंतु पोलिसांनी हे स्वतः पत्रकार परिषद घेऊन सांगावं, असंही विखेंनी स्पष्ट केलं. सुजय विखेंनी ड्रग्जसारख्या गंभीर प्रकरणावर आपली भुमिकाही स्पष्ट केली. ते म्हणाले, पोलिसांवर या प्रकरणात कुणाचा दबाव आहे, हे त्यांनी स्वतः सांगावं. मी जे प्रश्न उपस्थित करतोय, त्याचीही उत्तरे द्यावीत. अन्यथा पुढच्या आठ दिवसांत आपण स्वतः पत्रकार परिषद घेऊन या प्रकरणातील सगळ्यांची नावे उघड करु. गंभीर गुन्हा करणारे कुणाचेही कार्यकर्ते असो, त्यांना कायद्याने शिक्षा व्हायलायच हवी, असंही विखेंनी स्पष्ट केलं.

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत जि. प. प्राथमिक शाळा केळीरूम्हणवाडीच्या शिरपेचात मानाचा तुरा!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा मंगळवार दि. 20 जानेवारी 2026 रोजी अकोले येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केळीरूम्हणवाडी येथील विद्यार्थ्यांनी खो-खो या क्रीडा प्रकारात उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात पुन्हा एकदा मानाचा तुरा रोवला.



खो-खो स्पर्धेतील मोठा गट मुले आणि मोठा गट मुली या दोन्ही संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. या दुहेरी यशामुळे शाळेची क्रीडा परंपरा अधिक भक्कम झाली आहे.

या यशासाठी पंचायत समिती अकोलेचे गटशिक्षणाधिकारी मा. अरविंदजी कुमावत साहेब, समशेरपूर बीटच्या विस्तार अधिकारी श्रीम. फापाळे मॅडम, केंद्रप्रमुख श्रीम. खतोडे मॅडम, तसेच बीट व केंद्रातील सर्व शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन लाभले.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. गायकवाड सर, शाळेतील सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे सहकार्य केले.

या घवघवीत यशामागे क्रीडाप्रेमी, उत्कृष्ट मार्गदर्शक व राष्ट्रीय खो-खो पंच श्री. दीपकजी सुकटे सर यांचे विशेष योगदान लाभले असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. यशस्वी संघास मार्गदर्शन करणारे शिक्षक : मुख्याध्यापक श्री. गायकवाड सर, श्रीम. उगले मॅडम, श्री. तोरमल सर, श्री. बाळासाहेब एखंडे, श्री. सदगीर सर, श्री. सिंगापूर सर, श्री. सुकटे सर, श्रीम. लोखंडे मॅडम.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेच्या विद्यार्थ्यांचे, मार्गदर्शकांचे व पालकांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

# अध्यक्षपदी ॲड. बी. के. पांचाळ

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

कंधार अभिवक्ता संघाची २०२६-२७ ची कार्यकारनी निवडण्यासाठी अभिवक्ता संघाच्या वतीने निवडणुक कार्यक्रम जाहिर करण्यात आली होती. या निवडणुक प्रसंगी निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन कंधार अभिवक्ता संघाचे सदस्य.अॅड .शहाबाज खान. व अॅड. तथागत वाघमारे यांच्या अधिपत्याखाली अभिवक्ता संघाची निवडणुक घेण्यात आली. या निवडणुकीत निवडणुक लढवण्या साठी अध्यक्ष पदांसाठी तिन उमेदवार रिंगणात उभे होते. तर उपाध्यक्ष पदासाठी दोन, सचिव पदासाठी दोन, सहसचिव पदासाठी दोन, तर कोषाध्यक्ष पदासाठी दोन असे उमेदवारी अर्ज भरण्यात आले होते.कंधार तालुका अभिवक्ता संघाच्या अध्यक्षपदी अॅड. बी . के .पांचाळ यांची तर उपाध्यक्षपदी अॅड.एम.आय.खान, सचिवपदी अॅड.कलीम अन्सारी ,सहसचिव अॅड.हणमंत कुटे, कोषाध्यक्ष पदी अॅड.संतोष रंजिरे .यांची निवड करण्यात आली.

# माध्यमिक विद्यालय कोंभाळणे येथे मानव–बिबट संघर्ष जनजागृती मोहीम संपन्न!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य वन विभागाच्या वतीने महाराष्ट्र राज्य वन विभाग यांच्या पुढाकाराने माध्यमिक विद्यालय कोंभाळणे येथे मानव व बिबट संघर्षाबाबत जनजागृती मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमात शालेय विद्यार्थ्यांना वन्य प्राण्यांच्या हल्ल्यापासून बचाव कसा करावा, घरी व शेतात बिबट्यापासून संरक्षणासाठी कोणती काळजी घ्यावी, याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शाळेत येताना व घरी जाताना घ्यावयाच्या खबरदारीबाबतही सखोल माहिती देण्यात आली. वन्य प्राणी व मानव यांच्यातील संघर्ष टाळण्यासाठी आपण सर्वांनीच वन्य प्राण्यांचे संरक्षण करणे गरजेचे आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

या जनजागृती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मश्री बीजमाता राहीबाई पोपेरे उपस्थित होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून वाइल्ड लँड्स कॉन्व्हर्सेशन फाउंडेशन, नागपूरचे संचालक अजिंक्य भांबोरकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी वनरक्षक सौ. मनीषा तांबे, पारेकर साहेब, गोडे साहेब, वनसेवक नवनाथ बांबळे, विद्यालयाचे मुख्याध्यापक गोरक्षनाथ वाकचौरे, भास्कर कानवडे, तसेच सर्व शिक्षकवृंद व कर्मचारी उपस्थित होते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण होऊन मानव–वन्यजीव संघर्ष कमी करण्यास मदत होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

# ग्रामविकास अधिकाऱ्याच्या बदली प्रकरणी चौकशीची मागणी

- शासन परिपत्रकाची पायमल्ली केल्याचा आरोप
- अन्याय निवारण निर्मूलन सेवा समिती आक्रमक

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर पंचायत समिती अंतर्गत कापूरवाडी ग्रामपंचायतीतील ग्रामविकास अधिकारी यांच्या बदली प्रकरणात शासनाच्या बदली धोरणाचे उल्लंघन झाल्याचा आरोप करत चौकशी करून तात्काळ कारवाई करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली असून, याबाबतचे निवेदन समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी नाशिक विभागीय आयुक्तांना पाठविले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अहिल्यानगर जिल्हा परिषद अंतर्गत पंचायत समिती अहिल्यानगरच्या मौजे कापूरवाडी येथील ग्रामविकास अधिकारी हे तब्बल सात वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत होते. शासनाच्या बदली धोरणानुसार एका ठिकाणी ठरावीक कालावधीपेक्षा अधिक काळ सेवा दिल्यास संबंधित अधिकाऱ्याची बदली करणे बंधनकारक आहे. त्यानुसार जिल्हा परिषद, अहिल्यानगरच्या बदली मेमोप्रमाणे ग्रामविकास अधिकारी यांची पंचायत समिती राहुरी येथे तालुका बदली करण्यात आली होती. राहुरी पंचायत समितीत बदली झाल्यानंतर त्यांनी जवळपास तीन महिने काम केले. या कालावधीत त्यांचे मासिक वेतनही पंचायत समिती, राहुरी अंतर्गत घेण्यात आले होते. मात्र, कापूरवाडी ग्रामपंचायतीमध्ये मासिक वेतनासह अतिरिक्त आर्थिक लाभ मिळत असल्याने त्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) सामान्य प्रशासन यांच्याशी संगनमत करून पुन्हा कापूरवाडी ग्रामपंचायतीत बदली करून घेतल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

# बनावट दारूचा कहर; अकोले तालुक्यात ७० बळी, प्रशासन अजूनही शांत!

**(समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील विरगाव फाटा, समशेरपूर व इंदोरी फाटा या भागांत अवैध व बनावट दारू विक्रीने अक्षरशः थैमान घातले असून, या घातक व्यवसायामुळे आतापर्यंत ७० पेक्षा अधिक नागरिकांचे मृत्यू झाल्याचे गंभीर आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणावर जीवितहानी होऊनही प्रशासनाकडून ठोस कारवाई का होत नाही, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.




या परिसरात सकाळी सहा वाजल्यापासूनच दारूच्या दुकानांवर तळीरामांची गर्दी उसळते. उतारा घेतल्याशिवाय अनेकांना दिवस सुरू करता येत नाही, अशी भयावह सामाजिक स्थिती निर्माण झाली आहे. गुजरात राज्यातून बनावट दारू आणून ती खुलेआम विकली जात असल्याचे आरोप असून, दररोज कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असल्याची चर्चा आहे.

विशेष म्हणजे अनेक ग्रामपंचायतींमध्ये कागदोपत्री ग्रामरक्षक दलाची स्थापना दाखवली जाते, मात्र प्रत्यक्षात त्याचा कुठलाही मागमूस नाही. ग्रामपंचायतीची एनओसी नसतानाही अनधिकृत परमिट रूम व बियर बार सुरू असल्याचे समोर आले आहे. या ठिकाणी दोन गटांमध्ये झालेल्या भांडणात दोघांचे पाय गेले, तरीही अवैध दारू विक्री निर्ढावल्यापणे सुरूच आहे.



**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

या संपूर्ण प्रकाराविरोधात ज्येष्ठ समाजसेवक हेरंब कुलकर्णी यांनी वेळोवेळी आंदोलन छेडले. मात्र कारवाई करण्याऐवजी त्यांनाच चितावणी दिली जात असल्याची चर्चा असून, अवैध व्यावसायिकांना प्रशासनाकडून अभय दिले जात आहे का, असा संशय व्यक्त केला जात आहे.

ग्रामस्थांनी असा सवाल केला आहे की, "किती जणांचा बळी गेल्यानंतर प्रशासन जागे होणार?" केवळ कागदोपत्री कारवाई दाखवून प्रत्यक्षात 'जखम गुडघ्याला, मलम शेंडीला' असा प्रकार सुरू आहे का, अशीही टीका होत आहे.

या प्रकरणी पोलिस महानिरीक्षक नाशिक परिक्षेत्र दत्तात्रय कराळे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे, तसेच संगमनेर येथील उत्पादन शुल्क अधिकारी यांनी तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. अवैध दारू व्यवसायामागील मास्टरमाईंडला तडीपार करणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

या अवैध व्यवसायामुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले असून, महिलांनी मोर्चे, रास्ता रोको आंदोलन केली आहेत. तरीही काही काळ शांतता राखून पुन्हा हे धंदे जोमात सुरू होतात, अशी तक्रार आहे.

या गंभीर प्रकरणी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडेही तक्रारी करण्यात आल्या असून, पोलीस व उत्पादन शुल्क विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच जिल्हा पोलीस उपाधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी तरी या प्रकरणात ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

अकोले तालुक्यात अवैध व बनावट दारूमुळे मृत्यूंचा आकडा शेकडोच्या घरात जात असल्याचा आरोप होत असताना, आता तरी प्रशासन ठोस कारवाई करणार का, की अजून किती बळी गेल्यावर जाग येणार, हा प्रश्न संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे.



# संपादकीय

## अंधारा कालखंड उजळवणारा शीख परंपरेतील 'एक ओंकार'!

भारतीय इतिहासात अशी काही महान व्यक्तिमत्त्वे उदयास आली आहेत की, ज्यांचे जीवन समाजासाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरते. अशा महान विभुतींचे कार्य एखाद्या धर्माच्या चौकटीत न अडकता संपूर्ण मानवजातीसाठी अखंड प्रेरणेचा स्रोत ठरते. शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेगबहादूर जी, हे असेच एक महान व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सत्य, न्याय, करुणा, धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी अर्पण केले. त्यांच्या बलिदानाला ३५० वर्षे पूर्ण होत असताना, त्यांचे सामाजिक सुधारक म्हणून कार्य आणि विचार आजही तितकेच सुसंगत आणि मार्गदर्शक आहेत. १ एप्रिल १६२१ रोजी अमृतसर येथे जन्मलेले गुरु तेगबहादूर जी हे सहावे शीख गुरु श्री गुरु हरगोबिंद साहेब यांचे तेजस्वी पुत्र. बालपणापासूनच त्यांच्या जीवनावर अध्यात्म, शौर्य आणि सेवाभावाचे संस्कार कोरले गेले. वेद - उपनिषदे, इस्लामी तसेच भारतीय तत्त्वज्ञानाच्या सखोल चिंतनातून त्यांच्या विचारांना सर्वधर्मसमभाव आणि उदात्त मानवतावादाची झळाळी प्राप्त झाली. गुरु तेगबहादूर जी केवळ आध्यात्मिक गुरु नव्हते, तर ते एक प्रभावी सामाजिक सुधारक होते. त्या काळात भारतीय समाज जातीय भेदभाव, धार्मिक अत्याचार, अंधश्रद्धा आणि राजकीय दडपशाहीने ग्रासलेला होता. अशा परिस्थितीत त्यांनी समाजाला सत्य, समानता आणि नैतिकतेचा मार्ग दाखवला. भारतीय इतिहासात मुघल सम्राट औरंगजेब आणि गुरु तेगबहादूर जी, ही दोन व्यक्तिमत्त्वे परस्परविरोधी विचारधारांचे प्रतीक म्हणून समोर येतात. सत्ता, कट्टरता आणि धर्मांतराची सक्ती यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या औरंगजेबाने धर्म-युध्द पुकारले, तेव्हा गुरु तेगबहादूर जी यांनी औरंगजेबाच्या अन्यायी धोरणांना उघड आव्हान दिले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, धर्मस्वातंत्र्यावर गदा आणणे हे अधर्माचे लक्षण आहे. या संघर्षात त्यांनी स्वतःच्या प्राणाची आहुती देण्याचा मार्ग स्वीकारला. १६७५ साली दिल्लीच्या चांदणी चौकात गुरु तेगबहादूर जी यांनी दिलेले बलिदान कोणत्याही राजकीय सत्तेविरुद्ध नव्हते, तर विचार आणि धार्मिक स्वातंत्र्यासाठी होते. गुरु तेगबहादूर जी मानवतेचे अमर



नायक बनले. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' असे गौरवाने संबोधले जाते.

त्यांचे पुत्र श्री गुरु गोबिंदसिंग जी यांनी पुढे खालसा पंथाची स्थापना करून अन्यायाविरुद्ध संघटित लढ्याचा मार्ग दाखवला. आज आपण मानवाधिकारांची चर्चा करतो. पण, गुरु तेगबहादूर जी यांनी १७व्या शतकातच मानवी हक्कांचा पुरस्कार केला. धर्म मानण्याचा अधिकार, विचार करण्याचे स्वातंत्र्य आणि आत्मसन्मानाने जगण्याचा अधिकार हे मूलभूत मानवी हक्क आहेत, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले. त्या काळात अस्पृश्यता, भेदभाव आणि अन्याय हे भारतीय समाजजीवनाचे वास्तव होते. अशा विषम आणि अन्यायी सामाजिक रचनेत मानवी समानतेचा विचार मांडणे हे क्रांतिकारक धैर्याचे लक्षण होते. याच अंधाऱ्या काळात गुरु तेगबहादूर जी यांनी शीख परंपरेतील 'एक ओंकार' या तत्त्वाचा आशय समाजजीवनात उतरवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या दृष्टीने ईश्वर एकच असून, त्याची निर्मिती असलेला प्रत्येक मानव समान आहे. जात, धर्म, वर्ण किंवा पंथ यांवर आधारित श्रेष्ठ-कनिष्ठतेला त्यांनी स्पष्टपणे नकार दिला. जातीभेदाच्या जखमांवर करुणेचा लेप लावला आणि समाजाला समतेचा मार्ग दाखवला. गुरु तेगबहादूर जी यांच्या बाणीत आत्मचिंतनाला विशेष महत्त्व आहे. मनुष्याने प्रथम स्वतःच्या अंतःकरणाचा शोध घ्यावा, इच्छांचे बंधन ओळखावे आणि विवेकाच्या प्रकाशात जीवन जगावे, असा त्यांचा आग्रह होता.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ७५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | | | | 5 | 7 | | 1 |
| 6 | | 7 | 9 | | | | 5 | |
| | | | | | | 2 | | 6 |
| 4 | 7 | | 6 | 5 | 9 | | | 3 |
| | | | 1 | | 2 | | | |
| 5 | | | 4 | 8 | 7 | | 1 | 9 |
| 3 | | 8 | | | | | | |
| | 6 | | | | 3 | 9 | | 5 |
| 9 | | 2 | 5 | | | | | 7 |

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ७४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 4 | 5 | 3 | 9 | 8 | 2 | 6 | 1 |
| 3 | 2 | 6 | 1 | 4 | 7 | 8 | 5 | 9 |
| 1 | 9 | 8 | 5 | 6 | 2 | 7 | 4 | 3 |
| 4 | 8 | 1 | 7 | 2 | 5 | 3 | 9 | 6 |
| 2 | 6 | 3 | 8 | 1 | 9 | 4 | 7 | 5 |
| 5 | 7 | 9 | 6 | 3 | 4 | 1 | 8 | 2 |
| 6 | 5 | 4 | 2 | 7 | 3 | 9 | 1 | 8 |
| 8 | 3 | 7 | 9 | 5 | 1 | 6 | 2 | 4 |
| 9 | 1 | 2 | 4 | 8 | 6 | 5 | 3 | 7 |

उत्तर उद्याच्या अंकात

पंचांग
२४ जानेवारी २०२५
शनिवार
विक्रम संवत्- २०८२
माघ शके संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम

अयन- उत्तरायणारंभ
मास- माघ
ऋतु- सौर शिशिर
शुक्ल पक्ष
तिथि:षष्टी २४:४०:१३+
नक्षत्र:उत्तराभाद्रपद

१४:१५:४२
योग:शिव १४:०१:१३
करण:कौलव १३:१६:१४
करण:तैतिल
२४:४०:१३+
सूर्य:मकर

## उपदेशाचे डोस

### व्यसन

एकदा एका गांधीभक्तानं गांधीजींकडे सिगरेटच्या पाकिटावरचं एक लेबलच मुद्दाम पाठवलं. त्याच्यावर छापलं होतं, गांधीजींचं चित्र अन् त्या सिगरेटला नाव दिलं होतं, 'महात्मा गांधी सिगरेट'. आपल्या नावाचा तो दुरुपयोग बघून गांधीजींना अतिशय वाईट वाटलं. ते म्हणाले, 'माझ्या नावाने अनेक दुरुपयोग आहेतच झालेले पण जाणूनबुजून सिगरेटशी माझं नाव जोडून जितका अपमान झालाय माझा, तितका दुसऱ्या कशानंही झालेला नाही ! गोष्ट अशी आहे की, मला स्वत:ला तर दारुइतकंच धूम्रपानही भयानक वाटतं कारण धूम्रपान करणं ही एक अगदी घाणेरडी सवय आहे असंच माझं ठाम मत आहे. कारण असं की, या धूम्रपानामुळे माणसाचं अंत:करण मरून जातं आणि तसं होणं हे तर दारूहून वाईट कारण त्याचा दुष्परिणाम लगेच काही दिसून येत नाही आणि दुसरे म्हणजे ही अशी सवय आहे की ती एकदा जडली की मग सुटता सुटत नाही तसंच ती खर्चिकही आहे फार. आणखी असं की, विडी सिगरेट पिणाऱ्यांच्या श्वासाला पण घाण वास येतो. त्याच्या दातांचा रंगही बिघडतो. पुढे पुढे तर त्यानं कॅन्सरही होतो. कॅन्सर किती घातक हे आता कुणाला सांगायला नको ! गांधीजी पुढे म्हणाले, ज्यानं कोणी माझं नाव सिगरेटला दिलं त्यानं त्यासाठी माझी अनुमती काही घेतलेली नाही. जर या व्यापाऱ्यानं ही नावाची लेबल बाजारातून परत घेतली किंवा लोकांनी ही पाकिटं विकत घ्यायचीच नाहीत असं ठरवलं तर मी लोकांचा फार आभारी होईन.

कथा उपदेश : बिडी-सिगरेटचं व्यसन फार घातक आहे. ते लावून घेऊ नये.

## इतिहासात आजचा दिवस

### अंतरराष्ट्रीय

- ४१ - रोमन सम्राट कालिगुलाला त्याच्याच प्रेटोरियन रक्षकांनी मारले.
- ४१ - कालिगुलानंतर क्लॉडियस रोमन सम्राट झाला.
- १४३८ - बासेलच्या समितीने पोप युजेनियस चौथ्याला निलंबित केले.
- १६७९ -इंग्लंडचा राजा चार्ल्स दुसऱ्याने संसद बरखास्त केली.
- १७४२ -चार्ल्स सहावा आल्बर्ट पवित्र रोमन सम्राटपदी.

### राष्ट्रीय

- २००८ - पुणे फिल्म फेस्टिव्हल मध्ये उत्कृष्ट पटकथा व उत्कृष्ट छायालेखनासाठी गौरविण्यात आलेला तसेच गिरणी लघुपटासाठी राष्ट्रपती सुवर्णकमळ सन्मान मिळविणारे तरूण दिग्दर्शक उमेश कुळकर्णी यांचा 'वळू' हा धमाल चित्रपट ३७ व्या रोटरडॅम आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी निवडण्यात आला.


### जन्म

- ७६ - हेड्रियस, रोमन सम्राट यांचा जन्म.
- १७१२ - फ्रेडरिक दुसरा, प्रशियाचा राजा यांचा जन्म.
- १९०२ - ई.ए.स्पायसर, अमेरिकन बायबलतज्ञ यांचा जन्म.
- १९४५ - सुभाष घई, बॉलीवुड चित्रपट दिग्दर्शक यांचा जन्म.

### निधन

- ४१ - कालिगुला, रोमन सम्राट यांचे निधन.
- ७७२ - पोप स्टीवन चौथा यांचे निधन.
- ११२५ - डेव्हिड चौथा, जॉर्जियाचा राजा यांचे निधन.
- १३६६ - अरागोनचा आल्फोन्सो चौथा यांचे निधन.
- १९६५ - विन्स्टन चर्चिल इंग्लिश पंतप्रधान यांचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ७५



### आडवे शब्द

१. गाळ पण टाकाऊ नाही
२अ. ताळतंत्र सुटलेला
५. रोड टॅक्स-मराठीत
८. तोंडाचा पट्टा
११. पुरणपोळीबरोबर केली जाणारी आमटी
१२. अटीची भाषा
१४. चीज, वस्तू
१५. त्याग केला
१७. अर्धांगवायू
१९. ढीग
२१. सत्ता
२३. उत्तराधिकारी
२४. वाघाची मावशी
२५. शेवट, नाश
२६. मालक, सरदार, शासनसत्ता
२८. पाण्यापासून उत्पन्न
३१. चामखीळ
३३. एकरूप
३४. झाडाचे टॉनिक
३५. सरस्वती (ग्रा.)
३६. बातमी
३७. वारा, त्रास
३८. भांडण
४०. कैफ, धुंदी
४२. कधी मर्दानगीचे कधी भिकारपणाचे लक्षण
४३. नऊ भावना
४५. कडक व चिवट
४६. एक देवयोनी, स्वर्गातील गायक
४७. संत, अवलिया
४८. रागाचा ठिकाणा
४९. गंमत, मजा
५०. स्वयंपाकी
५३. आवाजांचा गोंधळ
५४. सन्मानाची रक्कम
५६. खोदकाम
५८. पुत्री, मुलगी
६०. लाकडी जिना
६२. दात
६४. जबरदस्त, धिप्पाड
६७. चेहऱ्यावरील कांती
६८. काळ्या तोंडाचे माकड
७०. राजपुत्र सलीमची प्रेयसी
७२.सवाद्य
७४. हिंदीत झणझणीत
७५. गायीचे पिल्लू
७७. शिक्षा
७८. मोगऱ्याची माळ
८०. खूळ
८२. अगदी सरळ
८३. दुसऱ्याच्या मनातील जाणणारा
८४. रश्शावरील तवंग, कट

### उभे शब्द

१. उमदा, रंगेल
२. बतावणी
३. आलेख- चढता वा उतरता, ४. पुरुष
५. घागरा
६. बटवा
७. रमापती
८. पृथ्वी, गाय
९. पूर्ण भरतीची वेळ
१०. सिंह
१३. समशेर
१६. पुत्र (हिंदी)
१८. दिवस
२०. लिंबू पाणी
२२. गंध
२४. पतंगाचा धागा
२५. अकस्मात
२६अ. ईदने सांगता होणारा उपवासाचा महिना
२७. खोकला
२८. पाणी देणारा
२९. फळातील द्रव
३०. वस्ती
३२. जास्तीत जास्त व कमीत कमी
३३. टोळीचा प्रमुख
३४. धोकादायक
३७. संधी
३९. बरोबर आलेला फौजफाटा
४१. शिक्षा
४३. पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना
४४. संपूर्ण
५०. घराणे
५१. शर्करा
५२. पाडाव, हार
५५. फायदा, ५७. पुरुष
५९. वनवास
६१. दार
६३. हुण्डा (हिंदी)
६५. घरंदाज, कुलीन स्त्री
६६. टपालकचेरी
६९. मत देणे
७१. मुंग्यांचे घर
७३. धट्टकट्टा
७६. फटाक्यांची माळ
७७. उथळ पसरट वाटी
७९. रात्र
८१. निर्माण झालेले अंतर

उत्तर उद्याच्या अंकात

### शब्दकोडे क्र. ७४ चे उत्तर

आडवे उत्तर : १.कसम ४.तेंडुलकर ८.हरहर १२.पारावार १३.रमणीय १४.राजधानी १६.काकीनाडा १८.गरम १९.मज २१.समय २३.खोलणे २५.गावकुटाळ २६.रद २७.पारवा ३०.काका ३१.पारा ३२.दमट ३४.कसर ३७.सनदशीर ३८.पायल ३९.पसायदान ४१.कोमल ४३.चाक ४४.मात्रा ४५.रस्सी ४६.लवलव ४७.वरवर ५०.रंभा ५१.आवळा ५२.वसाहत ५५.रत्न ५६.भार ५७.तपन ५८.विनाकारण ६०.शहर ६२.पाक ६३.राम ६५.रवाना ६६.वडीलधारी ६८.तडकाफडकी ७१.तसदी ७४.रसकस ७७.तरुण ७८.वनमाला ७९.रविवार

उभे उत्तर : १.कपार २.सरा ३.मवाली ५.डुलकी ६.कारडा ७.रम ८.हयगय ९.हरामखोर १०.रज ११.धनी १५.धावणे १६.काजळ १७.नाठाळ १९.पाव २०.मटार २१.सरकार २२.मद २४.लवाद २५.गायक २७.पारायण २८.खोट २९.मनन ३०.काशीयात्रा ३१.पापा ३३.मखमल ३५.सपक ३६.रसा ३७.सदाशिव ४०.कारभार ४१.कोवळा ४२.लवकर ४३.चाकवत ४६.लवकुश ४७.वहन ४८.रत ४९.रचना ५३.सापशिडी ५४.फारकत ५६.भारवाहक ५८.विपरीत ५९.कापा ६१.हर ६३.राका ६४.मफलर ६६.वसंत ६७.लक्ष्मण ६९.डगला ७०.कीरवा ७२.सव ७३.दीन ७५.सर ७६.सर्दी

# जीवाचे मागणे एकासाठी तर संताचे मागणे जगासाठी

## हभप कृष्णा महाराज राजूरकर

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

आपलं जीवन सुखकर झालं पाहिजे म्हणून माणूस देवाकडे काहीतरी मागतो परंतु माणूस इतरांसाठी काहीही मागत नाही कारण माणसाचा स्वभाव बदलायला हवा होता पण बदलत नाही हेच देवाला मान्य झालेलं नाही कारण माणसाच्या स्वभावाला आजवर तरी कोणतेही औषध निघालं नसल्याने माणूस फक्त आपल्या जीवासाठी काहीही मागतो परंतु संतांचे मागणे हे जगासाठी असते असे प्रतिपादन हभप कृष्णा महाराज राजूरकर यांनी शेळगाव छत्री येथील किर्तन रुपी सेवेत केले.

नायगाव तालुक्यातील मौजे शेळगाव छत्री येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा समस्त गावकऱ्यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.कीर्तनाच्या सातव्या दिवशी प्रसिद्ध कीर्तनकार कृष्णा महाराज राजूरकर यांनी कीर्तन रुपी सेवा करताना संत तुकाराम महाराज यांच्या.. मागणे तुज आहे देशील तरी पाहे पांडुरंगा.. या अभंगा आधारित भाविकांना कीर्तनातून मौलिक संदेश देत प्रबोधन केले.त्यांच्या कीर्तन सेवेला मृदंगावर साथ संजय गुरुजी उमाटे यांनी दिली तर व्यंकट महाराज एकलारकर वसंत पाटील बेळीकर,शंकर पाटील मुगावकर,रामकिशन पाटील चोंडे,सिद्धेश्वर महाराज, धोंडीबा महाराज मोकादरेकर, पुंडलिक महाराज आळंदीकर यांनीही टाळ विना व गायनाची साथ सांगत केली



आणि विशेषता शेळगाव छत्री येथे दरवर्षीच अखंड हरिनाम सप्ताह होत असल्याने यातून चंद्रशेखर अनेराये,सदानंद साखरे,अनिकेत डोंगरे, शुभम बरबडेकर, अविनाश सालेगाये,आदित्य सालेगाये,सवंसकार सालेगाये, यशराज सालेगाये,श्रीहरी सालेगाये,ओमकार पेदे,गणेश पेदे,शिवलिंग कंधारे,माधव बालाजी शहापुरे ही नवीन पिढी मृदंग टाळ विणा गायनासाठी तयार होत असताना या कीर्तनात त्यांनी आठही दिवस आवर्जून उपस्थिती लावली होती.कृष्णा महाराज राजूरकर यांनी कीर्तन सेवा करताना गावात श्रीमंत लोक राहतात परंतु उध्दार राहत नाहीत आजच्या गमतीदार लोकांचे वागणे बोलणे यावर विनोदी झालर लावून अनेक किस्से सांगितले यावेळी शेळगाव छत्री सह परिसरातील भाविकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती तर सप्ताह सोहळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी गावातील प्रत्येक नागरिकांनी अथक परिश्रम घेतले होते.

अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने अनेकाकडून संगती, महाप्रसाद, पालखीच्या मिरवणूकीत अनेक महिलांचा विशेष सहभाग व मिरवणुकीत विशेष आकर्षण हरी महाराज वाघे धानोरकर सायंकाळी जागरण यामुळे शेळगाव छत्री येथील भाविक भक्तिमार्गात चिंब झाले होते.

# कंधार तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयात १६ वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

कंधार तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयात जिल्हाधिकारी राहूल कर्डिले साहेब यांचे आदेशानुसार कंधार तालुक्यातीचे उपविभागीय अधिकारी विलास नरवटे , तहसीलदार रामेश्वर गोरे यांचे मार्गदर्शनाखाली १६ व्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदारांना शपथ देण्यात आली. तसेच कंधार तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद व खाजगी संस्था शाळेमध्ये राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदारांना शपथ देण्यात आली तसेच कंधार तालुक्यातील सर्व २३२ मतदान केंद्रावर राष्ट्रीय मतदार दिनाचे बॅनर लावून मतदारांना शपथ देणे कार्यक्रम घेण्यात आला. त्याचप्रमाणे शाळेत मतदार जनजागृती या विषयावर रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा,तसेच My India My vote या विषयावर वकृत्व स्पर्धा आयोजित करण्याच्या सुचना मा तहसीलदार साहेब कंधार यांनी दिले. त्याअनुषंगाने कंधार तालुक्यातील सर्व शाळांमध्ये राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.





सदरील कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी निवडणूक नायब तहसीलदार रेखा चामणर , सुरेश वंजे महसूल सहाय्यक तहसील कंधार, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचे पर्यवेक्षक मन्मथ थोटे स. शिक्षक, ऑपरेटर गंगाधर गोंटे यांनी परिश्रम घेतले.

# चार कुस्ती मल्लांची कुस्ती स्पर्धेसाठी निवड

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथे संपन्न झालेल्या अहिल्यानगर जिल्हा निवड चाचणी मध्ये राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेचे ॲड. एम.एन. देशमुख महाविद्यालय राजूर, गुरूवर्य रा.वि.पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर राजूर तसेच सर्वोदय विद्या मंदिर कातळापूर येथील चार कुस्ती मल्लांची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धांसाठी निवड झाली आहे. यामध्ये कु .सदगीर सार्थक वाळू याने ५७ किलो वजन गटात सुवर्णपदक व कु.दहिफळे रघुवीर चंद्रशेखर याने ३८ किलो वजन गटात सुवर्णपदक मिळवले,तसेच या दोघांची दिनांक ७ ते ८ फेब्रूवारी२०२६ नाशिक येथे होणाऱ्या राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच श्रीगोंदा या ठिकाणी अहिल्यानगर महिला कुस्ती निवड चाचणी संपन्न झाली .या मध्ये



कु.पराड अनामिका प्रवीण ६८ किलो वजन गटात सुवर्णपदक व कु.जाधव ईश्वरी पोपट ४९ किलो वजन गटात सुवर्णपदक मिळवले. तसेच यांची २८ जानेवारी इंदापूर या ठिकाणी राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे .अशी माहिती कुस्ती केंद्राचे कुस्ती कोच आंतरराष्ट्रीय पदक विजेते तानाजी नरके यांनी दिली आहे. या मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल सत्यनिकेतन संस्थेचे अध्यक्ष ॲड. मनोहरराव देशमुख, सचिव एम. एल.मुठे, कोषाध्यक्ष विवेकजी मदन, माजी सचिव टी.एन. कानवडे,संचालक मिलिंदशेठ उमराणी,प्रकाश टाकळकर, विजय पवार,एस.टी.येलमामे, श्रीराम पन्हाळे, सत्यनिकेतन संस्थेचे सर्व विद्यमान संचालक, प्राचार्य डॉ.बी.वाय.देशमुख,भाऊसाहेब बनकर,मधुकर मोखरे,संपत धुमाळ,उपप्राचार्य दिपक बुऱ्हाडे, सर्व प्राध्यापक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारीवृंद, विद्यार्थी,तसेच परिसरातील नागरिक यांचे वतीने यशस्वी विद्यार्थी व विद्यार्थिनींचे व त्यांचे मार्गदर्शक यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# हिंद दी चादर' शहीदी सत्संगात मोठ्या संख्येने सहभागी व्हा

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील सर्व जाती धर्माच्या नागरिकांनी नांदेड येथे दि. २४ व २५ जानेवारी रोजी 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी सत्संगात भव्य व ऐतिहासिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या जागतिक स्तरावरील धार्मिक व सांस्कृतिक सोहळ्यात नांदेडकरांनी व नायगाव तालुक्यातील मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे मनोज पाटील मोरे, व नायगाव तालुका अध्यक्ष बालाजी मदेवाड यांनी केले आहे. देशासह परदेशातूनही मोठ्या प्रमाणावर भाविक भक्त नंदिग्रम नगरित दाखल होणार असून, त्यांच्या स्वागतासाठी आणि कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नांदेडकरांनी व नायगाव तालुक्यातील स्वयंप्रेरणेने पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

# ठाणे जिल्हा माहिती कार्यालयात सुरक्षा आणि पर्यावरण वर्ष उपक्रमाचा शुभारंभ

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे जिल्हा माहिती कार्यालय, प्रादेशिक परिवहन विभाग ठाणे आणि वेसॅक इंडिया (VesacIndia) यांच्या संयुक्त विद्यमाने '2026- सुरक्षा आणि पर्यावरण वर्ष' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ आज ठाणे जिल्हा माहिती कार्यालय येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. रस्ते सुरक्षा सर्वांच्या दैनंदिन जीवनात अंगीकारली जावी आणि ती मानवी जीव वाचवणारा सकारात्मक 'छंद' म्हणून विकसित व्हावी, हा मोहिमेचा मुख्य संदेश उद्घाटन समारंभातून अधोरेखित करण्यात आला. यासाठी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे.

प्रसंगी वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ, कोकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष मनोज जालनावाला, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन





शिवाजी सानप, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर, वेसॅक इंडियाचे संस्थापक व सुरक्षा-अभ्यासक विजयकुमार कट्टी, माहिती अधिकारी प्रवीण डोंगरदिवे तसेच ठाणे जिल्हयातील पत्रकार उपस्थित होते. रस्ते सुरक्षा महिन्याच्या पार्श्वभूमीवर आजच्या कार्यक्रमात '15 चिन्हे - 15 कथा' पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. रस्ते वाहतूक संकेतांवरील 15 बोधकथांचे हे विशेष पुस्तक मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांमधील हार्ड कॉपी, ई-कॉपी आणि ऑडिओबुक असे सर्व पर्याय नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत.

'R.E.A.C.H.' Responsibility, Empathy, Awareness, Compassion संकल्पनेवर आधारित ७८ रस्ते सुरक्षा पोस्टर्सचे अनावरण करण्यात आले. ही सर्व डिझाईन्स प्रादेशिक परिवहन विभाग व वाहतूक विभागाच्या मानकांनुसार तयार केल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ यांनी रस्ता सुरक्षा ही केवळ शासनाची नव्हे तर प्रत्येक नागरिकाची वैयक्तिक व सामूहिक जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले. अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी वेगमर्यादा पाळणे, हेल्मेट व सीटबेल्टचा अनिवार्य वापर ही मूलभूत पण अत्यंत महत्त्वाची पावले असल्याचे त्यांनी सांगितले. वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांपेक्षा नियमांचे पालन करणारे नागरिक समाजासाठी प्रेरणादायी ठरतात, यावर त्यांनी भर दिला.

# सैनिक दाम्पत्याचा सन्मान व सत्कार



**तामसा : (समर्थ गांवकरी)**

> राजवाडी येथील घिसेवाड दांपत्यच्या देशसेवा साठी सज्ज

हदगांव तालुक्यातील राजवाडी येथील घिसेवाड दांपत्य यांनी आपलं BSF चा प्रशिक्षण पूर्ण करून प्रथमश आपल्या जन्मभूमी राजवाडी येथे आल्यावर त्यांच गावकरी व आमदार यांनी सन्मान करून सत्कार केला.

राजवाडी येथे .निरंजन पांडुरंग घिसेवाड व निकिता निरंजन घिसेवाड दोन्ही दांपत्य BSF मध्ये निवड होऊन निरंजन घिसेवाड व पोटा येथील विकास शेलार या दोघांनी प्रशिक्षण पूर्ण करुन आल्याबद्दल हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे

आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी त्यांचा सन्मान व सत्कार करुन देशसेवेसाठी शुभेच्छा दिल्यात.बीएसएफ (BSF) सैनिक देशाच्या सीमांचे रक्षण करणारे शूर जवान आहेत. कुटुंबापासून दूर राहून, दिवसरात्र सीमेवर कर्तव्य बजावतात, जेणेकरून देश सुरक्षित राहील. त्यांचे जीवन देशाच्या सेवेसाठी समर्पित असते, जिथे शिस्त, निष्ठा आणि दृढनिश्चय महत्त्वाचे असतात. बीएसएफ सैनिक हे देशाचे 'पहिले रक्षक' आहेत, जे आपल्या प्राणांची पर्वा न करता देशाच्या सीमांचे रक्षण करतात आणि देशाच्या सुरक्षेचा आधारस्तंभ आहेत.असे मनोगत आ. बाबुराव कदम यांनी व्यक्त केले कार्यक्रमात दंपत्याचा सन्मान करून सत्कार करण्यात आला.पांडुरंग धोंडिबा घिसेवाड यांच्या पाच मुली च्या एकुलता एक भाऊ असून देशसेवा चा ज्जबा अंगी आलेल्या आपल्या सुपुत्र ला देशसेवे साठी पाठविले, मुलाचं लग्न दोन वर्षपूर्वी मुदखेड तालुक्यातील मेंडका येथील निकिता सोबत झाल्यावर दोघांनी देशसेवा साठी आपलं जीवन समर्पित करण्याचं ठरवलं निकिता या महिला आपलं प्रशिक्षण पूर्ण करून मेघालंय ला रुजू झाले.

यावेळी मा. जिप सदस्य रमेश घंटलवार, नागनाथ घिसेवाड, संभाराव लांडगे, संदेश पाटील, सरपंच साईनाथ फुलारे, सरपंच ल्याहारी माधवराव बोईनवाड, पांडुरंग तेलूरे, सिद्देशवर क्षीरसागर, प्रदीप तंवर, शरद दुगाळे, दगडू तिगळवाडउपसरपंच केलास कड,व गावकरी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# विठ्ठल मुर्ती स्थापना व भव्य 'कीर्तन सोहळा'

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

बारड येथे जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज जन्मोत्सव सोहळा आणि श्री विठ्ठल मूर्ती स्थापना निमित्ताने 'भव्य कीर्तन सोहळ्याचे' आयोजन करण्यात आले आहे. मुदखेड, भोकर आणि अर्धापूर तालुक्यातील भाविकांसाठी हा भक्तीचा सोहळा एक सुवर्णयोग ठरणार आहे. हा सोहळा दि.२५ रविवार रोजी आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्ताने सायंकाळी ०७ ते ०९ या वेळेत विशेष कीर्तन सेवा पार पडणार असून, प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील बुलढाणेकर आपल्या रसाळ वाणीतून कीर्तन सादर करणार आहेत. हा कार्यक्रम बारड येथील संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी शिक्षण संस्थान येथे संपन्न होईल.

# जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा जांभळा येथे मातांचा पालक मेळावा उत्साहात संपन्न

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

जांभळा (ता. हदगाव) येथे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, जांभळा येथे विद्यार्थ्यां मातांचा पालक मेळावा उत्साहात पार पडला. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या तयारीसाठी पालकांशी चर्चा करणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता.

या मेळाव्याचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निरंजन सरकुंडे आणि मुख्याध्यापक नागेश क्यातमवार यांच्या हस्ते करण्यात आले.

मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबत तसेच सहशालेय उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक व शिक्षक यांच्यातील समन्वय महत्त्वाचा



असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. माता पालकांचे उद्बोधन करण्यासाठी शाळेतील शिक्षिका राजस गुंडेकर, मेघा चोंडेकर व वर्षा गुट्टे यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी माता पालक संघाच्या अध्यक्षा दैवशला पोलशेठवार या उपस्थित होत्या. तसेच वर्षाताई शेटे, विद्या हटकर, निकिता शेळके, अमृता शेळके, अनिता हटकर, श्रद्धा शेळके, सविता मेटकर, अरुणाबाई शेळके यांच्यासह अनेक माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमादरम्यान मातांसाठी शैक्षणिक व बौद्धिक खेळांचे आयोजन करण्यात आले. या खेळांमध्ये अनिता हटकर यांनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला.

# भव्य नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिर उत्साहात संपन्न

**भोकर : (समर्थ गांवकरी)**

"नयन निरोगी तर जीवन निरोगी" या ब्रीदवाक्यास अनुसरून मोतीबिंदू मुक्त गाव या संकल्पनेतून मौजे कांडली ता भोकर येथे ग्रामपंचायत कार्यालयात भव्य नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिराचे उद्घाटन चैतन्य बाबा , डॉ. प्रताप चव्हाण (वैद्यकीय अधीक्षक) व डॉ. साईनाथ वाघमारे यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी सरपंच कामाजी पेनलोड व उपसरपंच गणेश डुमलवाड उपस्थित होते. सूत्रसंचालन हनमनलू बडगर यांनी केले.

नांदेड येथील लायन्स क्लबच्या तज्ञ डॉक्टरांनी अत्याधुनिक उपकरणांद्वारे



> १८५ नागरिकांची तपासणी तर २५ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेची गरज, १२७ जणांना नवीन चष्मे

तपासणी केली. एकूण १८५ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. यामध्ये २५ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले असून त्यापैकी १३ रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी नांदेड येथे रवाना करण्यात आले आहे.

# छोट्या पडद्यावर 'बिग बॉस मराठी ६'चा डंका !

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

"शेकडो दारं, अनेक सदस्य... आणि एकच बॉस!" असं म्हणत सुरू झालेल्या 'बिग बॉस मराठी ६'च्या अभूतपूर्व यशाने संपूर्ण महाराष्ट्राला वेड लावलं आहे. या सिझनच्या पहिल्याच आठवड्यात रितेश भाऊंने सर्वांचं मन जिंकलं आहे. रितेश भाऊंचा तोच कडक अंदाज, त्यांचा जबरदस्त स्वॅग आणि प्रेक्षकांशी संवाद साधण्याची त्यांची खास शैली यामुळे हा सिझन घराघरांत पोहोचला आहे. रितेश भाऊंच्या जादूने यंदा केवळ टीव्हीच नाही, तर डिजिटल जगतावरही अधिराज्य गाजवलं असून, खऱ्या अर्थाने त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर आपली मोहोर उमटवली आहे. कलर्स मराठी आणि JioHotstar वर एकाच वेळी प्रसारित होणाऱ्या या सिझनने लोकप्रियतेचे सर्व जुने





विक्रम मोडीत काढले आहेत.

कलर्स मराठीवर, ग्रँड प्रीमियर आणि दैनंदिन भागांना जोरदार सुरुवात मिळाली असून, लाँचिंगच्या पहिल्याच आठवड्यात ३३ लाखांहून अधिक प्रेक्षकांनी हा कार्यक्रम पाहिला. 'बिग बॉस मराठी'च्या आगमनामुळे मराठी जनरल एंटरटेनमेंट चॅनेलच्या (GEC) प्रेक्षकसंख्येत आतापर्यंतची सर्वात मोठी वाढ दिसून आली आहे; ३४ GRPs वरून ७७ GRPs पर्यंत झालेली ही २.३ पट वाढ या शोची जनमानसातील पकड अधोरेखित करते. JioHotstar, पहिल्या भागाच्या 'रीच' मध्ये ५ व्या सीझनच्या प्रीमियरच्या तुलनेत २.२ पट आणि 'वॉच-टाइम' मध्ये ६.५ पट वाढ नोंदवण्यात आली. पहिल्या आठवड्यात JioHotstar वर देखील हा वेग कायम राहिला; गेल्या सीझनच्या तुलनेत व्हिडिओ व्ह्यूजमध्ये १.८ पट आणि वॉच-टाइममध्ये १.३ पट वाढ झाली असून, हे प्रेक्षकांचा वाढता कल आणि वारंवार पाहिल्या जाणाऱ्या संख्येचे निदर्शक आहे..

या अभूतपूर्व यशाचे मोठे श्रेय जाते ते म्हणजे महाराष्ट्राचा लाडका सुपरस्टार आणि शोचा होस्ट रितेश देशमुख यांना. प्रोमो रिलीज झाल्यापासूनच रितेश भाऊंच्या कडक डायलॉग्स नी सोशल मीडियावर धुमाकूळ घातला होता. "मागचा सिझन वाजवलाय, यंदाचा गाजवायचाय... आहात ना तय्यार!" या त्यांच्या वाक्याने प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचवली होती. ग्रँड प्रीमियर च्या दिवशी रितेश भाऊंचा तो अस्सल महाराष्ट्रीयन स्वॅग, 'लार्जर-दॅन-लाईफ' परफॉर्मन्स आणि त्यांच्या एन्ट्री ने प्रेक्षकांना खिळवून ठेवले. त्यांचं प्रभावी सूत्रसंचालन, आणि त्यांच्या शब्दांमधली धार यामुळे ग्रँड प्रीमियर ची रंगत अजूनच वाढली. या सगळ्यामुळेच सिझन ६ चा ग्रँड प्रीमियर हा विक्रमी टीआरपी मिळवणारा कार्यक्रम ठरला आहे. बिग बॉस मराठीच्या घरात १७ सदस्यांनी मोठ्या दिमाखात एंट्री घेतली, आणि संपूर्ण आठवडा प्रेक्षकांना राडा, भांडणं, मैत्री, याने खिळवून ठेवले.

यंदाच्या सिझनची थीम "दार उघडणार, नशिबाचा गेम पालटणार!" ही केवळ थीमच नाही, तर प्रत्यक्ष घरातील टास्क मध्ये दिसून येत आहे.

घरातील अतरंगी सदस्य, त्यांची 'कल्ला' करण्याची पद्धत आणि १०० कॅमेऱ्यांच्या नजरकैदेत बदलणारी नाती प्रेक्षकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरली आहेत. ११ जानेवारी रोजी सुरू झालेला हा प्रवास आता रोज प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल बोलताना सतीश राजवाडे म्हणाले, "बिग बॉस मराठी च्या या अभूतपूर्व यशाचा खरा मानकरी आपला प्रेक्षक आहे. टेलिव्हिजन रेटिंगचा हा चढता आलेख आणि JioHotstar वर मिळालेला प्रेक्षकांचा प्रतिसाद पाहून खूप अभिमान वाटतोय.

'बिग बॉस मराठी आणि भाऊच्या धक्क्या' वर महाराष्ट्र जो विश्वास दाखवतोय, त्यासाठी आम्ही मनापासून प्रेक्षकांचे ऋणी आहोत. अजून तर खेळ सुरू झाला आहे, पुढे अजून रंगत वाढणार हे नक्की!"

तेव्हा पहा 'बिग बॉस मराठी' सिझन ६, दररोज रात्री ८:०० वाजता फक्त कलर्स मराठी आणि JioHotstar वर!

# पारनेर बदनाम करण्याचा कट; शिर्डीतील गुन्हेगारीकडे दुर्लक्ष का?

## खासदार नीलेश लंके यांचा थेट सवाल : ड्रग्ज प्रकरण, नगर-मनमाड रस्ता, घोटाळे व राजकीय स्टंटबाजीवर पत्रकार परिषदेत घणाघाती भूमिका

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील पारनेर तालुका आणि स्वतःची बदनामी करण्यासाठी जाणीवपूर्वक आरोपांची मालिका रचली जात असून, पारनेरशी कनेक्शन जोडण्याऐवजी शिर्डीत नेमके काय सुरू आहे, याची चौकशी व्हायला हवी, असा थेट आणि परखड सवाल खासदार नीलेश लंके यांनी नगर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला. खासदार डॉ. सुजय विखे यांनी केलेल्या आरोपांना प्रत्युत्तर देताना खासदार लंके यांनी ड्रग्ज प्रकरणापासून ते नगर-मनमाड रस्त्याच्या कामापर्यंत अनेक मुद्द्यांवर स्पष्ट भूमिका मांडली.



एलसीबीचा कर्मचारी शामसुंदर गुजर ड्रग्ज प्रकरणात अडकलेला असून, तो पूर्वी पारनेरमध्ये कार्यरत होता, याचा उल्लेख करत खासदार लंके म्हणाले, "ड्रग्ज कोणाच्या घरात ठेवले होते, त्याला एलसीबीमध्ये नियुक्त करण्यासाठी कोणी शिफारस केली, हे महत्त्वाचे प्रश्न आहेत. मात्र या प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी पारनेर आणि माझ्यावर आरोप करण्याचा सोपा मार्ग निवडला जात आहे." "शिर्डीत काय चालले आहे, याकडे लक्ष द्यायला हवे. बाबांनी सुरू केलेल्या अन्नछत्रामुळे गुन्हेगारी वाढली, असे केविलवाणे विधान कोणी केले होते, हे जनतेला माहीत आहे. तिथे सचिन गीधे या शेतकरी कुटुंबातील तरुणाला जाळून मारले गेले, त्याचा मृतदेहही मिळाला नाही. त्या प्रकरणातील आरोपी कोण, हे आधी स्पष्ट व्हायला हवे," असा सवाल लंके यांनी उपस्थित केला. ग्रोअर प्रकरणातील हजार-बाराशे कोटींच्या कथित घोटाळ्याचा उल्लेख करताना खासदार लंके म्हणाले, "तो घोटाळा करणारा साळवे कोणाचा कार्यकर्ता होता? त्या टीमला अटक होऊ नये म्हणून सवलत कोणी दिली? तपास एका सहाय्यक पोलिस निरीक्षकाकडे का देण्यात आला? या प्रश्नांची उत्तरे देणे गरजेचे आहे." नगर-मनमाड रस्त्याच्या कामावरून होत असलेल्या टीकेला उत्तर देताना खासदार लंके म्हणाले, "पाच वर्षे खासदार असताना हा रस्ता का झाला नाही? रस्ता खणून ठेवला गेला, मृत्यूचा सापळा बनला आणि शेकडो लोकांचे बळी गेले. मी खासदार झाल्यानंतर पहिल्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकले, नवा ठेकेदार नेमला आणि आज काम वेगाने सुरू आहे."

### सिस्पे घोटाळ्यावर खुलासा

सिस्पे घोटाळ्याच्या आरोपांबाबत बोलताना खासदार लंके म्हणाले, "इन्फिनिटी कंपनीच्या कार्यालयाच्या उद्घाटनासाठी आम्हाला निमंत्रण होते म्हणून आम्ही गेलो. तिथे अण्णा हजारे, पोपटराव पवार, आमदार उपस्थित होते. उद्घाटनाला जाणे म्हणजे गुंतवणूक करणे नव्हे. कोणत्याही कार्यकर्त्याचा किंवा माझा या घोटाळ्याशी संबंध नाही."

### 'कुत्रे भुंकतात, हत्ती चालत राहतो'

"कोणाला तरी पुढे करून प्रेस घ्यायला लावण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र हे सगळे प्रयत्न अपयशी ठरत आहेत. कुत्ते भुंकते है, हत्ती चलता है," अशा शब्दांत खासदार नीलेश लंके यांनी पत्रकार परिषदेत आपली भूमिका ठामपणे मांडली.





उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे दैनिक समर्थ गांवकरी समुहाचे वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या 2026 दिनदर्शिका प्रकाशन सोहळा प्रयागराज रसिका पीठाधीश्वर महान्त श्री जन्मजेय शरण जी महाराज जानकी घाट अयोध्या यांचा तुकाराम महाराज पगडी घालून सत्कार करण्यात आला व थोर समाजसेवक नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या शुभहस्ते प्रकाशन करण्यात आले येथील कुंभमेळा.... यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे दैनिक समर्थ गांवकरी महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर

# एम.आय.डी.सी. अहिल्यानगर परिसरामध्ये अवैध दारु विक्रेत्याविरुध्द स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

मा. श्री सोमनाथ घार्गे साहेब, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांनी स्थानिक गुन्हे शाखेस अहिल्यानगर जिल्ह्यामधील अवैध दारु विक्री करणारे इसमांची माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिलेले आहेत.

सदर आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री किरणकुमार कबाडी यांचे नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अंमलदार गणेश लबडे, सुयोग सुपेकर, शाहिद शेख, सागर ससाणे, उत्तरेश्वर मोराळे यांचे पथक तयार करुन सदर पथकास अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये अवैध रित्या दारु विक्री करणारे इसमांची माहिती काढुन कारवाई करणेबाबत सुचना व मार्गदर्शन करुन पथकास रवाना केले.

वर नमुद पथक दि.२१जानेवारी रोजी एम.आय.डी.सी. परिसरामध्ये अवैध रित्या दारु विक्री करणारे इसमांची माहिती काढत असतांना पथकास गुप्त माहितीनुसार अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर रोडलगत असलेले हॉटेल राजयोग या ठिकाणी अवैधरित्या दारु विक्री होत असल्याची माहिती प्राप्त झाली.

पथकाने त्या ठिकाणी जावुन खात्री केली असता सदर ठिकाणी इसम नामे संदीप रावसाहेब आव्हाड (वय- ४२ वर्षे, रा. पांगरमल, ता. जि. अहिल्यानगर) हा विनापरवाना विदेशी दारु विक्री करण्याचे उद्देशाने कब्जात बाळगतांना मिळुन आला आहे. सदर इसमाचे ताब्यातुन ११,०००/- रुपये किमतीची विविध कंपन्याची विदेशी दारु जप्त करण्यात आलेली आहे. ताब्यातील इसम नामे संदीप रावसोहब आव्हाड यांचेविरुध्द पोकॉ/902 सागर अशोक ससाणे, स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे गु.र.नं. 57/2026 महाराष्ट्र दारुबंदी कायदाक लम 65 (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई मा. श्री. सोमनाथ घार्गे पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेली आहे.

# साहित्य मंडळाचे पुरस्कार जाहीर

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

मातोश्री भागाबाई डोंगरे प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यावर्षी आठ व्यक्तिंची निवड झाली असून यात कादंबरीकार मोतीराम राठोड, आंबेडकरवादी विचारवंत प्रा. डॉ. आनंद इंजेगांवकर, ज्येष्ठ साहित्यिक भारत सातपुते, कवयित्री प्रतिभा पांडे, पत्रकार पांडुरंग सोनकांबळे, कवयित्री सोनाली बेले, प्रा.शेख शेहनाज, गझलकार चंद्रकांत कदम यांची तर अक्षरोदय साहित्य मंडळाच्या वतीने देण्यात येणाऱ्या पुरस्कारांत भीमशाहीर माधवदादा वाढवे आणि ज्येष्ठ कवयित्री विमलताई शेंडे यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे सचिव ग्रामीण कवी नागोराव डोंगरे, राज्यस्तरीय पुरस्कार निवड समिती प्रमुख तथा येथील साहित्यिक समीक्षक प्रज्ञाधर ढवळे, अक्षरोदयचे कार्याध्यक्ष सदानंद सपकाळे यांनी आज येथे घोषणा केली.

# अवैधरित्या नशेचे इंजेक्शन बॉटल्या विकणाऱ्या इसमावर कारवाई

## स्थानिक गुन्हे शाखा अहिल्यानगरची कारवाई

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर जिल्हा घटकामध्ये मा. श्री सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांनी नशेचे इंजेक्शन/पदार्थ विकाणा-या इसमांची माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिलेले आहे.

सदर आदेशानुसार पो.नि. श्री किरणकुमार कबाडी, स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांनी अवैधरित्या नशेचे इंजेक्शन/ बॉटल्या विकणा-या इसमांची माहिती काढून कारवाई करणेबाबत पोउपनि/ अनंत सालगुडे, गणेश लबडे, संतोष खैरे, सुयोग सुपेकर, दिपक घाटकर, रोहित येमुल, अमोल आजबे, उत्तरेश्वर मोराळे, महिला पोलीस अंमदार वंदना मोढवे यांना सुचना देवुन रवाना केले.

सदर पथक अहिल्यानगर शहरात अवैधरित्या नशेचे बॉटल्या/इंजेक्शन विकणा-यांची माहिती घेत असतांना पथकास गेल्या दि. २३ रोजी रात्री २ वा.चे सुमारास इसम नामे रोहित रघुनात बांगर रा.बागडपट्टी अहिल्यानगर हा परवानधारकास डॉक्टराचे चिठ्ठीशिवाय विकता न येणारे औषध व इंजेक्शन विक्री करण्याकरीता कुरिअरद्वारे मागविले असुन तो विक्री करण्यासाठी कब्जात बाळगुन सिध्देश्वर मंदिर बागडपट्टी अहिल्यानगर येथे थांबलेला असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने सदर ठिकाणी जावुन खात्री करता एक इसम संशयीतरित्या थांबलेला दिसुन आला. तेव्हा पथकाने त्यास ताब्यात घेवुन पोलीस पथक व पंचाची ओळख समजावुन



सांगुन त्याचे नांव पत्ता विचारले असतांना त्याने त्याचे नांवे १) रोहित रघुनाथ वंगार (वय- २५ वर्षे रा. सिध्देश्वर मंदिराजवळ, बागडपट्टी, अहिल्यानगर) असे असल्याचे सांगितले. त्याला झडतीचा उद्देश समजावुन सांगुन त्याची झडती घेतली असता त्याचे कब्जातुन एकुण ११,२९९/- रुपये किमतीचा नशेकरीता वापरल्या जाणा-या ३७ बॉटल्या जप्त करण्यात आले आहे.

ताब्यात घेतलेल्या आरोपी यांचे विरुध्द स्थानिक गुन्हे शाखेचे पोहेकॉ/164 गणेश शिवनाथ लबडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना स्टेशन गु. र. नं. 50/2026 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 123,125,278 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास तोफखाना पोलीस स्टेशन करीत आहे.


सदरची कारवाई मा. श्री. सोमनाथ घार्गे पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेली आहे.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई यांच्या वतीने सद्गुरु माता सुदिक्षा जी महाराज यांना राज्यस्तरीय 'कौस्तुभ पुरस्कार' जाहीर; २६ जानेवारीला सांगलीत होणार सन्मान!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा यावर्षीचा राज्यस्तरीय 'कौस्तुभ पुरस्कार' निरंकारी संत समागम यांच्या राष्ट्रीय प्रवक्त्या सद्गुरु माता सुदिक्षा जी महाराज यांना जाहीर करण्यात आला आहे. अध्यात्म, मानवता, सामाजिक समरसता आणि विश्वबंधुत्वाचा संदेश देत समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणाऱ्या त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

हा मानाचा पुरस्कार दि. २६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता सांगली येथे आयोजित करण्यात आलेल्या ५९ व्या महाराष्ट्र निरंकारी संत समागम सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहे. या भव्य सोहळ्यात चंद्रकांत दादा पाटील, महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तसेच सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री, यांच्या शुभहस्ते सद्गुरु माता सुदिक्षा जी महाराज यांना मानपत्र व स्मृतिचिन्ह प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे.



या प्रसंगी संजयजी भोकरे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक राज्य संघटक, तसेच सिद्धार्थ भोकरे, सोशल मीडियाचे प्रदेश अध्यक्ष, यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय विविध क्षेत्रांतील मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, अध्यात्मिक अनुयायी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

निरंकारी मिशनच्या माध्यमातून सद्गुरु माता सुदिक्षा जी महाराज यांनी देश-विदेशात मानवता, सेवाभाव, शांतता आणि एकात्मतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचवला आहे. सामाजिक सलोखा, पर्यावरण संरक्षण, युवक प्रबोधन, तसेच सेवा कार्यांमधील त्यांचे योगदान समाजासाठी प्रेरणादायी ठरले आहे. याच कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने त्यांची 'कौस्तुभ पुरस्कार' साठी निवड केली असल्याचे संघटनेतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास पत्रकार, सामाजिक संस्था, निरंकारी मिशनचे अनुयायी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. विश्वासराव आरोटे (राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तसेच संपादक – दैनिक समर्थ गांवकरी), नवनाथ जाधव (प्रदेश प्रसिद्धी प्रमुख) आणि संजय फुलसुंदर (महाव्यवस्थापक) यांनी संयुक्त निवेदनाद्वारे केले आहे.

राज्यस्तरीय कौस्तुभ पुरस्कार प्रदान सोहळा हा सांगलीसह संपूर्ण महाराष्ट्रासाठी गौरवाचा क्षण ठरणार असून, या माध्यमातून सामाजिक एकोपा व मानवतावादी विचार अधिक दृढ होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# 'भारत माता की जय'च्या जयघोषात पुण्यात तिरंगा पूजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

'भारत माता की जय' अशा देशभक्तीपर जयघोषात पुण्यात तिरंगा पूजनाचा प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'घरघर तिरंगा' अभियानांतर्गत जम्मू-काश्मीरमधील भारत-पाक सीमेवरील पुच्छ जिल्ह्यात ९ मराठा रेजिमेंटच्या वतीने १,००० तिरंग्यांचे वितरण करण्यात येणार आहे. हे तिरंगे पुच्छ जिल्ह्यातील सीमावर्ती भागातील घरांपर्यंत पोहोचवले जाणार आहेत. या उपक्रमासाठी आम्ही पुणेकर संस्थेच्या पुढाकाराने तिरंगे पाठवण्याचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. जांभूळवाडी येथील विवा सरोवर परिवाराच्या वतीने दत्त मंदिरात या तिरंग्यांचे विधीवत पूजन करण्यात आले.

# मनातील जिद्द, सातत्यपूर्ण सरावाने खेळाडू घडतो

## आंतरराष्ट्रीय जलतरणपटू मिहीर आंब्रे यांचे मत; 'मएसो क्रीडा करंडक २०२६'चे उद्घाटन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

खेळामुळे केवळ शारीरिक तंदुरुस्तीच नव्हे, तर आपल्या आयुष्यात उपयोगी पडणाऱ्या अनेक गोष्टी मिळतात. खेळात हार-जीत होणे, यापेक्षाही खिलाडूपणाची भावना मोठी असते. तुमच्या मनातली खेळाविषयीची जिद्द आणि सरावातील सातत्य टिकवून ठेवा, तुम्ही नक्की यशस्वी व्हाल. त्यातूनच एक चांगला खेळाडू घडतो, असे मत छत्रपती पुरस्कारप्राप्त आंतरराष्ट्रीय जलतरणपटू मिहीर आंब्रे यांनी विद्यार्थ्यांशी बोलताना व्यक्त केले.





महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या (मएसो) क्रीडावर्धिनी आणि बालशिक्षण मंदिर इंग्लिश मिडीयम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मएसो क्रीडा करंडक' या राज्यस्तरीय आंतरशालेय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन मिहीर आंब्रे यांच्या उपस्थितीत बालशिक्षण मंदिर इंग्लिश मिडीयम स्कूल, मयूर कॉलनी कोथरूड येथे पार पडले. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष एअरमार्शल (निवृत्त) भूषण गोखले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी 'मएसो'च्या नियामक मंडळाचे अध्यक्ष बाबासाहेब शिंदे, उपाध्यक्षा आनंदी पाटील, क्रीडावर्धिनी व शाला समितीचे अध्यक्ष विजय भालेराव, 'मएसो'चे सचिव अतुल कुलकर्णी, सहसचिव सुधीर भोसले, शाला समिती महामात्र डॉ. नेहा देशपांडे, मुख्याध्यापिका अदिती कुलकर्णी, मंजुषा दुर्वे, सायली देशमुख यांच्यासह संस्थेचे व शाळेचे पदाधिकारी उपस्थित होते. मिहीर आंब्रे यांनी स्पर्धेचा शुभंकर वीर मॅस्कॉट आणि फुगे सोडून, तसेच ज्योत पेटवून स्पर्धेचे उद्घाटन केले.

मिहीर आंब्रे म्हणाले, "तुमच्याएवढाच छोटा असताना, खेळांची वाट पहायचो. खेळ आपल्याला शिस्त शिकवतात, खिलाडूपणा, एकाग्रता वाढवतात. खेळताना विकसित झालेली कौशल्ये आयुष्यात वेगवेगळ्या प्रसंगी उपयोगी पडतात. शालेय वयातच क्रीडा संस्कृती रुजली, तर आपल्याला मोठेपणी कोणताही खेळ खेळता येतो.

# 'दैनिक समर्थ गांवकरी' दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन!





**ब्राम्हणवाडा : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथील दत्तवाडी परिसरात आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने भक्तिरसाने ओथंबलेला कार्यक्रम उत्साहात पार पडला. या सप्ताहात ह.भ.प. श्रावण महाराज जगताप (येवला) यांचे सुश्राव्य कीर्तन आयोजित करण्यात आले होते. त्यांच्या प्रभावी वाणीने आणि भक्तिभावपूर्ण अभंग-कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. या धार्मिक कार्यक्रमानंतर 'दैनिक समर्थ गांवकरी' दिनदर्शिका २०२६ चे विधिवत प्रकाशन करण्यात आले. दिनदर्शिकेच्या प्रकाशनप्रसंगी पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी दैनिक समर्थ गांवकरीचे वृत्त संपादक संजय भाऊ गायकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन केले. धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यामुळे परिसरात भक्तीमय आणि उत्साही वातावरण निर्माण झाले.

# डॉ. विश्वासराव आरोटे व दानशूर व्यक्तिमत्व नानजीभाई ठक्कर यांचे शाही स्नान!

- अध्यात्म, पत्रकारिता व समाजसेवेचा त्रिवेणी संगम!

**प्रयागराज : (समर्थ गांवकरी)**

भारतीय संस्कृतीत अत्यंत पवित्र आणि श्रद्धेचे सर्वोच्च स्थान असलेल्या प्रयागराज येथील गंगा, यमुना व अदृश्य सरस्वती यांच्या त्रिवेणी संगमावर महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे मुख्य संपादक डॉ. विश्वासराव आरोटे आणि ठाण्यातील प्रख्यात ज्येष्ठ दानशूर समाजसेवक नानजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांनी अत्यंत भक्तिभावाने पवित्र गंगा स्नान केले. पत्रकारितेतील कर्तव्यनिष्ठ नेतृत्व आणि समाजसेवेतील ऋषीदत्त व्यक्तिमत्त्व यांचा संगम झाल्याने हा आध्यात्मिक सोहळा विशेष अर्थपूर्ण ठरला.



तीर्थराज प्रयागराज हे केवळ भौगोलिक स्थान नसून भारतीय अध्यात्म, संस्कृती व परंपरेचे प्रतीक आहे. येथे केलेले स्नान आत्मशुद्धी, सामाजिक बांधिलकी आणि नवचैतन्य देणारे मानले जाते. याच भावनेतून डॉ. विश्वासराव आरोटे व नानजीभाई ठक्कर यांनी त्रिवेणी संगमावर विधिवत शाही स्नान करून देशातील पत्रकार, समाजसेवक तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्य, सुख-समृद्धी व सामाजिक सलोख्यासाठी प्रार्थना केली.

त्रिवेणी संगमाच्या पवित्र तीरावर अनुभवी पुरोहितांच्या मार्गदर्शनाखाली वेदोक्त मंत्रोच्चारात संकल्प सोडण्यात आला. जलाभिषेक, अर्घ्यदान आणि विशेष पूजा विधी पार पडले. मंत्रोच्चारांच्या गजरात आणि गंगेच्या प्रवाहास साक्षी ठेवून झालेल्या या विधीने परिसर पूर्णतः भक्तिमय झाला होता.

> "गंगेचे दर्शन आणि स्नान हे केवळ धार्मिक विधी नसून आत्मिक शुद्धीची प्रक्रिया आहे. नानजीभाईंसारख्या ज्येष्ठ आणि मार्गदर्शक व्यक्तिमत्त्वासोबत या पवित्र भूमीवर येण्याचे भाग्य लाभले. समाजाप्रती आपली जबाबदारी अधिक प्रभावीपणे पार पाडण्यासाठी येथे अपार सकारात्मक ऊर्जा मिळाली आहे."
>
> **— डॉ. विश्वासराव आरोटे**
> **(मुख्य संपादक, दैनिक समर्थ गांवकरी तथा राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ)**

डॉ. विश्वासराव आरोटे यांनी आपल्या पत्रकारितेच्या प्रवासात नेहमीच मूल्याधिष्ठित, निर्भीड आणि समाजहिताला प्राधान्य देणारी भूमिका घेतली आहे. समर्थ गावकरीच्या माध्यमातून ग्रामीण प्रश्न, सामाजिक अन्याय आणि पत्रकारांच्या हक्कांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे. प्रयागराजच्या या पवित्र भूमीवर त्यांनी लोकसेवेचा आणि पत्रकारहिताचा संकल्प अधिक दृढ केल्याचे सांगितले.

ठाण्यातील ज्येष्ठ दानशूर समाजसेवक नानजीभाई ठक्कर यांनी आपल्या आयुष्यभराच्या कार्यातून समाजसेवेचा वस्तुपाठ दिला आहे. शिक्षण, आरोग्य, धार्मिक व सामाजिक उपक्रमांना त्यांनी नेहमीच भरीव पाठबळ दिले आहे. या आध्यात्मिक प्रवासादरम्यान त्यांनी डॉ. आरोटे यांच्याशी समाजउन्नती, नैतिक मूल्ये आणि भावी पिढीला दिशा देणाऱ्या उपक्रमांवर सखोल चर्चा केली.

प्रयागराज येथील वास्तव्यादरम्यान डॉ. आरोटे आणि नानजीभाई ठक्कर यांनी विविध आखाड्यांतील साधू-संतांची भेट घेतली. त्यांच्या आशीर्वादाने या आध्यात्मिक यात्रेला अधिक पवित्र आणि प्रेरणादायी स्वरूप प्राप्त झाले.

या शाही स्नानामुळे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या सभासदांमध्ये उत्साहाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अध्यात्म आणि व्यावसायिक कर्तव्य यांचा सुंदर समन्वय कसा साधता येतो, याचे उदाहरण या यात्रेतून अधोरेखित झाले.

ही तीर्थयात्रा म्हणजे श्रद्धा, कर्तव्य आणि समाजसेवेचा एक आदर्श अध्याय ठरला असून भविष्यातील सामाजिक व पत्रकारितेच्या वाटचालीस नवी दिशा देणारी ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.